- वितरण -
नागपूर-अकोला-वाशिम-खामगाव-बुलढाणा-अमरावती-वर्धा-यवतमाळ-चंद्रपूर-गडचिरोली-भंडारा-गोंदिया

# दैनिक सिंहवाणी वृत्त

प्रखर लेखणीचा साक्षीदार

संपादक (विकास) : श्याम पेठकर ▸ संचालक-संपादक : अजय बिवडे

Reg. No : MHBIL/25/A4140 | Mail Id : sinhvanivrutta@gmail.com | दिनांक : शनिवार, १८ जुलै २०२६ | Epaper : epaper.sinhvani.com | पृष्ठे : ४ | वर्ष : १ | अंक : २१९ | किंमत : २ रूपये

**सोने-चांदी**
- २४ कॅरेट : १,५८,७०० /-
- २३ कॅरेट : १,५६,३५० /-
- चांदी : २,७८,३००/-

**विदर्भातील सर्व जिल्ह्यामध्ये प्रतिनिधी नेमणे आहे...**
विदर्भातील सर्व जिल्ह्यांमध्ये शहर, ग्रामिण भागात प्रतिनिधी नेमणे आहे. अनुभवी व इच्छुक असलेल्यांनी संपर्क साधावा...
- दैनिक सिंहवाणी वृत्त -
९६५७२३२०२६, ८६९८७८८६६६

**सर्व प्रकारची प्रिंटींग अगदी कमी दरात...**
नागपूरातून अत्याधुनिक छपाई मशीनव्दारे कमी दरात सर्व प्रकारची प्रिंटींग करण्याची सुवर्णसंधी...
- आजच संपर्क करा -
८६९८७८८६६६
९६५७२३२०२६

# 'मी २० जुलैपर्यंत जीवंत राहीन, नाहीतर भूत बनून परत येईन'

## सोनम वांगचुक यांचा उपोषणाचा निर्धार कायम

**वृत्तसंस्था, नवी दिल्ली**
नीट परीक्षा गैरव्यवहार प्रकरणी केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांच्या राजीनाम्याची मागणी करत सामाजिक कार्यकर्ते सोनम वांगचुक यांचे दिल्लीतील जंतर-मंतर येथे उपोषण सुरू आहे. २० दिवसांपासून सुरू असलेल्या उपोषणामुळे वांगचुक यांचे शरीर अत्यंत थकले असून त्यांची प्रकृती खालावली आहे. मात्र, तरीही त्यांचा विद्यार्थ्यांना न्याय मिळवून देण्याचा उपोषणाचा निर्धार कायम आहे. सोनम वांगचुक यांच्या उपोषणाला देशभरातून पाठिंबा मिळत आहे. अनेक राजकीय नेते, कलाकार त्यांची भेट घेत आहेत. यादरम्यान सोनम वांगचुक यांनी जंतरमंतरवर उपस्थिक विद्यार्थी आणि इतर समर्थकांना संबोधित केले. मी २० जुलैपर्यंत कोणत्याही परिस्थितीत जीवंत राहीन. मात्र, जर नागरिक या आंदोलनात सहभागी झाले नाहीत आणि २० तारखेचा मोर्चा यशस्वी झाला नाही तर, मी भूत बनून परत येईन, असे वक्तव्य त्यांनी केले. वांगचुक यांच्यावर सध्या डॉक्टरांचे पथक सतत लक्ष ठेवून आहे. आपल्या खालावत्या प्रकृतीबाबत बोलताना ते म्हणाले की, माझे शरीर बाहेरून नक्कीच कमजोर झाले आहे, पण मनातून खूप मजबूत आहेत. मला खात्री आहे की आमचे



समर्थकही मनातून आणि शरीराने मजबूत आहेत. संसदेवर काढण्यात येणाऱ्या शांततापूर्ण मोर्चासाठी या ऊर्जेची गरज असल्याचे सोनम वांगचुक म्हणाले. जनतेला लोकशाहीच्या मंदिरात एकत्र येऊन आवाज उठवण्याचे आवाहन केले आहे.

### २० जुलैला संसदेवर भव्य मोर्चा


या आंदोलनादरम्यान नीट पेपर लीक प्रकरणात कडक कारवाईची सुरुवात व्हावी आणि केंद्रीय शिक्षणमंत्र्यांनी आपल्या पदाचा राजीनामा द्यावा, ही मुख्य मागणी लावून धरण्यात आली आहे. जंतरमंतरवर कॉक्रोच जनता पार्टीच्या आंदोलनाचा आज २८ वा दिवस असून या आंदोलनाचा पुढचा टप्पा म्हणून २० जुलै रोजी संसदेवर भव्य मोर्चा काढण्यात येणार आहे.
सोनम वांगचुक यांनी समर्थकांच्या आग्रहाखातर उपोषण मागे घेण्याची विनंती मान्य केली असली, तरी त्यांनी एक महत्त्वाची अट ठेवली आहे. त्यानुसार ते २० जुलैच्या आंदोलनानंतरच आपले उपोषण अधिकृतपणे सोडणार आहेत. परीक्षांमधील कथित गैरव्यवहार आणि विद्यार्थ्यांच्या भविष्यासाठी पुकारलेल्या या आंदोलनाकडे आता संपूर्ण देशाचे लक्ष लागले आहे.

---

**थोडक्यात**

### चाबहारमधील टॉवर कोसळला

**चाबहार :** शुक्रवारी अमेरिकेने केलेल्या हवाई हल्ल्यांमध्ये इराणच्या चाबहार बंदरातील एक देखरेखीसाठीचा टॉवर कोसळल्याचे दिसून आले आहे. हे बंदर अफगाणिस्तानसाठी महत्त्वाचा व्यापारी मार्ग असल्याचे मानले जाते. अमेरिकेचे संरक्षणमंत्री पीट हेगसेथ यांनी हा देखरेखीसाठीचा टॉवर कोसळताना दिसत असल्याचे छायाचित्र प्रसिद्ध केले. हेगसेथ यांनी ते छायाचित्र शेअर करण्यापूर्वीच ते सोशल मीडियावर काही युझर्सनी प्रसारित केले होते.
चाबहार बंदर यापूर्वीही अमेरिकेच्या हवाई हल्ल्यांचे वारंवार लक्ष्य ठरले आहे. या बंदरावर तिसऱ्यांदा हवाई हल्ले झाल्याची माहिती इराणच्या सरकारी माध्यमांनी दिली, मात्र टॉवर कोसळल्याच्या संदर्भातील उल्लेख त्यांनी केला नाही. हा टॉवर बंदरातील व्यापारी जहाजांच्या हालचालींवर देखरेख ठेवण्यासाठी असल्याचे सांगितले. इराणची रिव्होल्युशनरी गार्ड संघटनाही देशातील विविध बंदरांवर कार्यरत आहे, असे पीटीआयच्या वृत्तात सांगण्यात आले आहे.



---

# आंध्र प्रदेशात कोरोनाच्या रुग्णांत वाढ

**वृत्तसंस्था, कडप्पा**
आंध्र प्रदेशमध्ये कोरोना हातपाय पसरत आहे. राज्याचे आरोग्य आयुक्त जी. वीरपांडियन यांनी माहिती दिली आहे की, २६ जून ते १६ जुलै दरम्यान कोरोनाचे १२ रुग्ण आढळले आहेत. त्यामुळे याचा प्रसार वाढू नये, यासाठी योग्य त्या उपाययोजना करण्यात येत आहे.
२६ जून ते १६ जुलै दरम्यान आंध्र प्रदेशात कोरोनाचे १२ नवीन रुग्ण आढळले, त्यापैकी चार रुग्णांचा मृत्यू झाला. सर्व मृत रुग्णांना आधीपासूनच काही आजार होते. सर्वाधिक रुग्ण कडप्पा जिल्ह्यात आढळले. २६ जून ते १६ जुलै दरम्यान आंध्र प्रदेशात कोरोनाचे १२ नवीन रुग्ण आढळले. त्यातील चार रुग्णांचा मृत्यू झाला आहे. मृत रुग्ण आधीपासूनच गंभीर आजाराने ग्रस्त होते. कडपा येथील रिम्स रुग्णालयात एक कोविड वॉर्ड आणि विलगीकरण कक्ष उभारण्यात आला आहे.



आरोग्य आयुक्तांनी सांगितले की, मृत्यू झालेल्या चार रुग्णांना उच्च रक्तदाब, मधुमेह आणि मूत्रपिंडाचा आजार यांसारखे आधीपासून असलेले आजार होते. यापैकी तीन रुग्ण कडपा जिल्ह्यातील आणि एक काकीनाडा येथील होता. आंध्र प्रदेशातील २०२६ मधील पहिला कोरोना रुग्ण २६ जून रोजी कडप्पा जिल्ह्यात आढळला. त्यानंतर, १ ते १६ जुलै दरम्यान आणखी ११ रुग्ण आढळले. संक्रमित रुग्णांच्या संपर्कात आल्यानंतर दोन जण आजारी पडले. वीरपांडियन यांनी स्पष्ट केले की, हे सर्व रुग्ण वेगवेगळ्या विभागांमधून आढळले असून ते कोणत्याही एका भागात एकवटलेले नाहीत.
त्यांनी पुढे सांगितले की, २६ जून ते १५ जुलै दरम्यान राज्यात एकूण ६७ कोविड चाचण्या करण्यात आल्या, त्यापैकी ११ जण पॉझिटिव्ह आढळले. बारावा रुग्ण तामिळनाडूतील वेल्लोर येथील ख्रिश्चन मेडिकल कॉलेजमध्ये आढळला. संक्रमित रुग्णांपैकी तीन जण गृह विलगीकरणात आहेत, दोन जणांवर रुग्णालयात उपचार सुरू आहेत आणि तीन जण बरे होऊन घरी परतले आहेत, अशी माहिती त्यांनी दिली.

---


### मोस्ट वॉन्टेड गँगस्टर नितीन कौशलला अमेरिकेत अटक

**न्यूयॉर्क :** अमेरिकेत खून, अपहरण आणि अंमली पदार्थांच्या तस्करीसारख्या गंभीर गुन्ह्यांमध्ये सामील असलेल्या नितीश कौशल या भारतीय गँगस्टरला एफबीआयने व्हर्मोन्ट राज्यातून अटक केली आहे. एफबीआयने त्याचा समावेश मोस्ट वॉन्टेड यादीत केला होता. त्यानंतर अवघ्या दोन दिवसांतच त्याला बेड्या ठोकण्यात आल्या आहेत. एफबीआयने गुरुवारी सोशल मीडिया प्लॅटफॉर्म एक्सवर एक पोस्ट शेअर करून या अटकेची माहिती दिली. नितीश कौशल हा मूळचा भारतीय नागरिक असून तो जग्गू भगवानपुरिया संघटित गुन्हेगारी टोळी या आंतरराष्ट्रीय गुन्हेगारी सिंडिकेटचा सक्रिय सदस्य आहे. तो या टोळीच्या सांगण्यावरून अपहरण, प्राणघातक हल्ले आणि इतर हिंसक कृत्ये करत असल्याचा आरोप आहे.

---

## देशातील पहिली हायड्रोजन ट्रेन सुरू

**वृत्तसंस्था, नवी दिल्ली**
पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी शुक्रवारी देशातील पहिल्या हायड्रोजन ट्रेनला हिरवा झेंडा दाखवून रवाना केले. ही ट्रेन जींद ते सोनीपत दरम्यान धावली. यासोबतच, हायड्रोजन इंधनावर चालणारी ट्रेन सुरू करणारा भारत जगातील पाचवा देश बनला आहे. यापूर्वी जर्मनी, फ्रान्स, स्वीडन आणि चीनमध्येच हायड्रोजन ट्रेन्स धावत आहेत.
पंतप्रधान मोदी म्हणाले जींद-सोनीपत दरम्यान धावणारी ही ट्रेन जगातील सर्वात शक्तिशाली हायड्रोजन ट्रेन आहे. या ट्रेनची रचना भारतातील अभियंत्यांनी केली आहे आणि भारतातीलच कंपनीने ती बनवली आहे. १० डब्यांची ही ट्रेन जींद-सोनीपत मार्गावर १४ स्थानकांदरम्यान जास्तीत जास्त ७५ किमी प्रति तास वेगाने धावेल. याचे भाडे ५ ते २५ रुपयांच्या दरम्यान ठेवण्यात आले आहे. ट्रेन ८९ किलोमीटरचा प्रवास सुमारे २ तासांत पूर्ण करेल. पंतप्रधान मोदींनी एलिव्हेटेड रेल्वे ट्रॅक,



दोन वैद्यकीय महाविद्यालयांसह ८ प्रकल्पांचे उद्घाटन आणि पायाभरणी देखील केली.

**स्वच्छतेला बनवा आपला संस्कार**

पंतप्रधानांनी जींद आणि हरियाणातील लोकांच्या स्वच्छता अभियानातील सहभागाचे कौतुक केले. ते म्हणाले की, गेल्या एका आठवड्यापासून ते सोशल मीडियावर स्वच्छता अभियान पाहत होते. त्यांनी लोकांना सांगितले की, स्वच्छतेसाठी त्यांच्या येण्याची वाट पाहू नये. जर जींदच्या लोकांनी संकल्प केला, तर स्वच्छतेला आपला स्वभाव आणि संस्कार बनवून दररोजच्या जीवनाचा भाग बनवू शकतात.

**रेल्वेमध्ये मोठा बदल, डिझेलवरील अवलंबित्व कमी झाले**

पंतप्रधान म्हणाले की, १९२५ ते २०१४ पर्यंत सुमारे ९० वर्षांत देशाच्या रेल्वे नेटवर्कचे केवळ ३० टक्के विद्युतीकरण झाले होते, तर ७० टक्के भाग डिझेलवर अवलंबून होता. गेल्या १२ वर्षांत सुमारे ९९ टक्के रेल्वे नेटवर्कचे विद्युतीकरण झाले आहे. जर होर्मुज सामुद्रधुनीमध्ये युद्धासारखी परिस्थिती आधी निर्माण झाली असती, तर डिझेल पुरवठा बाधित झाल्याने रेल्वेही संकटात येऊ शकली असती, पण आता परिस्थिती बदलली आहे.

---

# शेतीला आता दिवसा वीज; काटोल तालुक्यात ४ मेगावॅट सौर प्रकल्प कार्यान्वित

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**
ग्रामीण महाराष्ट्राच्या कृषी क्षेत्राला बळकटी देण्यासाठी आणि शेतकऱ्यांच्या स्वप्नांना नवी दिशा देण्यासाठी राज्य शासनाने अत्यंत महत्त्वाकांक्षी 'मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी २.०' ही योजना हाती घेतली आहे. या योजनेचा एक महत्त्वपूर्ण टप्पा म्हणून गुरुवार, १६ जुलै रोजी नागपूर जिल्ह्यातील काटोल तालुक्यातील ३३/११ के.व्ही. कचारी सावंगा उपकेंद्र परिसरात ४ मेगावॅट क्षमतेचा अत्याधुनिक सौर ऊर्जा प्रकल्प यशस्वीपणे कार्यान्वित करण्यात आला.
महाराष्ट्र शासन आणि महावितरण यांचा संयुक्त उपक्रम असलेल्या 'मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी २.०' योजने अंतर्गत नागपूर जिल्ह्यातील हा पहिलाच सौर ऊर्जा प्रकल्प असून, यामुळे १,०७४ शेतकऱ्यांच्या कृषीपंपांना दिवसा वीज पुरवठा करण्याच्या राज्य शासनाच्या संकल्पनेला




प्रत्यक्ष कृतीची जोड मिळाली आहे.
या प्रकल्पाची उभारणी प्रामुख्याने शेतकऱ्यांच्या गरजा लक्षात घेऊन करण्यात आली आहे. या सौर प्रकल्पामुळे कचारी सावंगा उपकेंद्राशी जोडलेल्या रिधोरा, खापरी कुटूंबा, घरतवाडा, गुजर खेडी, सबकुंड, कोकरडा, कचेरी सावंगा, बोरखेडी आणि पंचधर या नऊ गावातील सुमारे १०७४ कृषी पंपांना दिवसा आठ तास अखंडित वीज पुरवठा उपलब्ध होणार आहे.
आतापर्यंत शेतकऱ्यांना रात्रीच्या वेळी वीज पुरवठ्यावर अवलंबून राहावे लागत होते, ज्यामुळे त्यांना अनेक संकटांचा सामना करावा लागत असे. आता दिवसा वीज मिळाल्यामुळे सिंचनाचे नियोजन करणे सोपे होणार असून, त्याचा थेट फायदा पिकांच्या उत्पादनावर होणार आहे.
अशा मोठ्या स्वरूपाच्या प्रकल्पाची यशस्वी उभारणी करणे हे एक आव्हानात्मक काम होते. यासाठी महावितरणच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांचे दूरदृष्टीपूर्ण मार्गदर्शन लाभले. यामध्ये नागपूर परिमंडळाचे मुख्य अभियंता राजेश नाईक, नागपूर ग्रामीणचे अधीक्षक अभियंता संजय वाकडे, काटोल विभागाचे कार्यकारी अभियंता नरेंद्र कटारे आणि चाचणी विभागाचे कार्यकारी अभियंता नरेंद्र धवड यांनी या संपूर्ण प्रकल्पावर बारीक लक्ष ठेवून तांत्रिक मार्गदर्शन केले. त्यांच्या मार्गदर्शनामुळेच हा प्रकल्प अत्यंत कमी वेळेत पूर्ण करणे शक्य झाले.
या सौर प्रकल्पाची प्रत्यक्ष उभारणी आणि त्यापुढील सर्व तांत्रिक बाबी हाताळण्यासाठी काटोल विभागाचे अतिरिक्त कार्यकारी अभियंता अशोक सोनगडे, चाचणी विभागाचे बुंदे, कोंढळी उपविभागाचे उपकार्यकारी अभियंता निलेश भगत आणि कनिष्ठ अभियंता अशिष कुलसंगे व वैष्णवी पाटील यांनी अहोरात्र मेहनत घेतली आहे. त्यांच्या कष्टाचे फळ म्हणून आज हा प्रकल्प शेतकऱ्यांच्या सेवेत दाखल झाला आहे. एम.के.एफ. ग्रीन एनर्जीज प्रा. लि. या संस्थेने अत्यंत दर्जेदार पद्धतीने या सौर प्रकल्पाची निर्मिती केली आहे.
मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी २.० योजनेच्या माध्यमातून आतापर्यंत नागपूर ग्रामीण मंडळात ४ मेगावॅट क्षमतेचे सौर ऊर्जा प्रकल्प कार्यान्वित झाले आहेत. ही केवळ सुरुवात असून, आगामी काळात अशा अनेक सौर प्रकल्पांद्वारे जिल्ह्यातील ग्रामीण भागातील कृषी वीज पुरवठा अधिक सक्षम आणि शाश्वत केला जाणार आहे. सौर ऊर्जेच्या वापरामुळे केवळ शेतकऱ्यांना फायदा होणार नाही, तर पर्यावरणपूरक ऊर्जेलाही चालना मिळणार आहे.
कचारी सावंगा येथील या प्रकल्पामुळे काटोल तालुक्यातील कृषी अर्थव्यवस्थेला एक नवी ऊर्जा मिळाली असून, स्थानिक शेतकऱ्यांनी या उपक्रमाबद्दल समाधान व्यक्त केले आहे. शासनाच्या या उपक्रमामुळे 'शेतकरी समृद्धी'चे स्वप्न प्रत्यक्षात येण्याच्या दिशेने एक आश्वासक पाऊल पडणार असल्याचे मनोगत मुख्य अभियंता राजेश नाईक यांनी व्यक्त केले आहे.

---

## कागदाऐवजी आता येणार प्लास्टिकच्या नोटा

**वृत्तसंस्था, नवी दिल्ली**
डिजिटल पेमेंट आणि वढक व्यवहारांचा वापर देशात मोठ्या प्रमाणात वाढला असला, तरी रोखीचे व्यवहार आजही कायम आहेत. अशातच भारतीय चलनी नोटांबाबत एक महत्त्वाची माहिती समोर आली आहे. रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाशी (आरबीआय) संबंधित नोट छपाई कंपनीने पॉलिमर शीट खरेदीसाठी प्रक्रिया सुरू केल्याचे वृत्त आहे. त्यामुळे भारतात भविष्यात पॉलिमर अर्थात प्लास्टिक नोटा पाहायला मिळणार का, याची चर्चा सुरू झाली आहे.
मात्र, पॉलिमर शीट खरेदीची प्रक्रिया सुरू झाली म्हणजे सध्याच्या १०, २०, १००, २०० किंवा ५०० रुपयांच्या नोटा तातडीने बदलल्या जाणार, असा त्याचा अर्थ होत नाही. याबाबत अंतिम निर्णय आणि अधिकृत घोषणा होणे अद्याप बाकी आहे. सध्या नागरिकांनी घाबरण्याचे कोणतेही कारण नाही. पॉलिमर नोटांसंदर्भातील प्रक्रिया म्हणजे सध्याच्या नोटा लगेच चलनातून बाद होणार किंवा बदलून घ्याव्या लागणार, असे नाही. पॉलिमर



नोटा आणण्याचा अंतिम निर्णय झाल्यास आरबीआयकडून त्याबाबत अधिकृत घोषणा केली जाईल. कोणत्या मूल्याच्या नोटा पॉलिमरमध्ये छापल्या जातील, त्या कधी बाजारात येतील आणि सध्याच्या नोटांचे काय होईल, याची माहितीही त्यानंतरच स्पष्ट होईल.

**पॉलिमर शीट खरेदीसाठी प्रक्रिया सुरू**

मिळालेल्या माहितीनुसार, भारतीय रिझर्व्ह बँक नोट मुद्रण प्रायव्हेट लिमिटेड अर्थात बीआरबीएनएमपीएलने चलनी नोटांसाठी वापरल्या जाणाऱ्या पॉलिमर सब्सट्रेटसंदर्भात प्रक्रिया सुरू केली आहे. यासाठी जगभरातील पात्र कंपन्यांकडून एक्स्प्रेशन ऑफ इंटरेस्ट मागवण्यात आल्याचे सांगितले जात आहे. पॉलिमर सब्सट्रेटचा वापर कागदाऐवजी अधिक टिकाऊ चलनी नोटा तयार करण्यासाठी केला जातो. त्यामुळे या प्रक्रियेकडे भारतातील पॉलिमर नोटांच्या संभाव्य वापराच्या दृष्टीने पाहिले जात आहे.

**बीआरबीएनएमपीएल म्हणजे काय ?**

बीआरबीएनएमपीएल म्हणजे भारतीय रिझर्व्ह बँक नोट मुद्रण प्रायव्हेट लिमिटेड ही आरबीआयची पूर्ण मालकी असलेली उपकंपनी असून देशातील चलनी नोटांच्या छपाईमध्ये तिची महत्त्वाची भूमिका आहे. पॉलिमर सब्सट्रेटसाठी एडक प्रक्रिया सुरू झाल्यामुळे भारतात अशा नोटांच्या वापराच्या शक्यतांवर पुन्हा चर्चा सुरू झाली आहे. मात्र, कोणत्या मूल्याच्या नोटांसाठी पॉलिमरचा वापर केला जाईल किंवा तो केव्हा सुरू होईल, याबाबत अधिकृत स्पष्टता आवश्यक आहे.

**प्लास्टिक किंवा पॉलिमर नोटा म्हणजे काय ?**

सामान्य चलनी नोटा प्रामुख्याने विशेष प्रकारच्या कागदी किंवा कापूस-आधारित सामग्रीपासून तयार केल्या जातात. पॉलिमर नोटा मात्र विशेष प्रकारच्या सिंथेटिक मटेरियलपासून तयार केल्या जातात.

संपादकीय लेखणीतून...

# अस्वस्थ रेंचो आणि जनता

नीट पेपरफुटी प्रकरण तसेच केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांच्या राजीनाम्याच्या मागणीसाठी सामाजिक आणि पर्यावरण कार्यकर्ते सोनम वांगचुक हे १८ दिवसांपासून दिल्लीतील जंतरमंतरवर उपोषणाला बसले आहेत. या प्रकरणाची आता दिल्ली उच्च न्यायालयाने दखल घेतली आहे. या संदर्भात याचिका दाखल करण्यात आली असून त्यांना तात्काळ वैद्यकीय सुविधा आणि उपचार देण्याची मागणी करण्यात आली आहे. याबाबत न्या. देवेंद्रकुमार उपाध्याय आणि न्या. तेजस करिया यांच्या खंडपीठाने केंद्र तसेच दिल्ली सरकारकडून गुरुवारी (१६ जुलै) सकाळपर्यंत उत्तर मागितले आहे. बार असोसिएशनच्या बहिष्कारामुळे सरकारकडून कोणताही वकील उपस्थित नसल्याने सुनावणी उद्या होणार आहे. याचिकाकर्ते राकेशकुमार सैनी यांनी व्हीडीओ कॉन्फरन्सिंगद्वारे सांगितले की, उपोषणामुळे वांगचुक यांची प्रकृती खालावत आहे. न्यायालयाने तातडीने सुनावणी करावी.

नीट पेपरफुटी आणि परीक्षांमधील गैरव्यवहार प्रकरणी शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांच्या राजीनाम्याच्या मागणीसाठी वांगचुक २८ जूनपासून उपोषण करत आहेत. सामाजिक कार्यकर्ते आणि वकील राकेशकुमार सैनी यांच्या याचिकेत सरकारने वांगचुक यांना तातडीने आपत्कालीन उपचार, जीवनरक्षक उपचार आणि आवश्यक पोषण उपलब्ध करून द्यावे. त्याचबरोबर त्यांच्या आंदोलनाशी संबंधित मुद्यांवर चर्चा सुरू करावी अशी मागणी करण्यात आली आहे. उपोषणामुळे वांगचुक यांचे सुमारे सव्वा आठ किलो वजन कमी झाले आहे. त्यांना कमी रक्तशर्करा, चक्कर येणे, जास्त अशक्तपणा आणि स्नायू कमकुवत होण्यासारख्या समस्या येत असल्याचे सांगण्यात येते. एखाद्याचा जीव धोक्यात असताना सरकार गप्प बसू शकत नाही. उपोषणाचा अधिकार शांततापूर्ण विरोधाचा भाग आहे. पण नागरिकाचा जीव वाचवणे ही सरकारची जबाबदारी आहे. वांगचुक यांच्या ढासळत्या प्रकृतीमुळे देशात चिंतेचे वातावरण आहे. चित्रपटसृष्टीतील कलाकारांनीही या आंदोलनाला आपला पाठिंबा दर्शवला आहे.

ज्येष्ठ अभिनेते आणि सामाजिक कार्यकर्ते सयाजी शिंदे यांनी या गंभीर विषयावर सरकारला खडे बोल सुनावले आहेत. थ्री इडियट्स चित्रपटातील लोकप्रिय रॅन्चो हे पात्र सोनम वांगचुक यांच्याच खऱ्या आयुष्यावरून प्रेरित आहे, ही आठवण करून देताना शिंदे यांनी सरकारला सवाल केला आहे. ते म्हणाले, तुम्हाला मंत्रिपद टिकवायचे असेल तर नक्की टिकवा, पण वांगचुक यांचा जीव तरी वाचवा. चित्रपटातील रॅन्चोवर तुम्ही भरभरून प्रेम केले, मग खऱ्या आयुष्यातील या रॅन्चोकडे सरकार दुर्लक्ष का करत आहे? सयाजी शिंदे यांनी वांगचुक यांना प्रकृतीची काळजी घेण्यासाठी उपोषण मागे घेण्याची भावनिक विनंती केली. वांगचुक हे देशाची संपत्ती आहेत आणि त्यांना सुरक्षित ठेवणे ही आपली सामूहिक जबाबदारी आहे असे शिंदे म्हणाले. सोनम यांच्यासोबत अनेक विद्यार्थी या आंदोलनात सहभागी झाले आहेत. ज्येष्ठ अभिनेत्री शबाना आझमी यांनी वांगचुक यांना उपोषण संपवण्याचे भावनिक आवाहन करताना म्हटले की, देशाला तुमच्यासारख्या व्यक्तीची नितांत गरज आहे. तुम्ही अन्यायाविरुद्ध आणि सत्यासाठी उभे राहता याचा आम्हाला अभिमान आहे. तुमचे मार्गदर्शन देशभरातील विद्यार्थ्यांना प्रेरणा देते.

त्यासाठी तुम्ही निरोगी राहणे महत्त्वाचे आहे. वांगचुक यांच्या समर्थनार्थ झीनत अमान, अभय देओल, नसिरूद्दीन शाह, रत्ना पाठक शाह, ओमी वैद्य आणि रुबिना दिलैक यांनीही उपोषण मागे घेण्याची आणि सरकारने संवाद सुरू करावा अशी मागणी केली आहे. लोकशाही म्हणजे केवळ निवडणुका नव्हेत. लोकशाही म्हणजे विरोधी मत ऐकण्याची तयारी, जनभावनांचा आदर आणि सत्तेपेक्षा समाजाला प्राधान्य देण्याची संस्कृती. कोणत्याही लोकशाहीची खरी ताकद तिच्या विरोधकांशी ती कशी वागते यावर ठरत असते. सामाजिक कार्यकर्ते, शिक्षणतज्ज्ञ आणि रॅमन मॅगसेसे पुरस्कार विजेते सोनम वांगचुक अनेक दिवसांपासून जंतरमंतरवर उपोषण करत आहेत. त्यांच्या मागण्या मान्य कराव्यात की नाही, त्यांच्याशी सहमत व्हावे की मतभेद असावेत हा वेगळा विषय आहे. पण एका राष्ट्रीय पातळीवरील व्यक्तीने लोकशाहीच्या चौकटीत शांततापूर्ण आंदोलनाचा मार्ग स्वीकारला असताना केंद्र सरकारने त्याची दखलही घेऊ नये, ही गोष्ट सरकारची असंवेदनशीलताच दर्शवते. सरकारने आंदोलकांच्या सर्वच मागण्या मान्य कराव्यात असे नाही, पण सरकारने संवाद साधणे गरजेचे होते. देशभरातील लाखो विद्यार्थी स्पर्धा परीक्षांमधील गैरव्यवहार, पेपरफुटी, परीक्षा व्यवस्थेतील त्रुटी आणि पारदर्शकतेच्या प्रश्नांमुळे अस्वस्थ आहेत.

# रिल्सच्या नादात बालपण हरवल्याची कथा...

प्रा. डॉ. सुधीर अग्रवाल
वर्धा

मोबाईल हाताळत असताना बोटं सराईतपणे स्क्रीनवर अचानक एका चिमुरडीची एक रील समोर आली. वय साधारण सात ते दहा वर्षे, म्हणजे प्राथमिक शाळेत जाणारी, जिच्या हातात या वयात पाटी-पेन्सिल किंवा खेळाचे चेंडू असावेत. त्या चिमुरडीने आपल्या सख्ख्या काकीच्या मोबाईल कॅमेऱ्यासमोर अत्यंत सहजपणे म्हणजे अगदी कॅज्युअली एक अत्यंत अश्लील, लैंगिक आणि समाजात निषिद्ध मानली गेलेली शिवी दिली. तिची ती वात्रट, उद्धट धाटणी आणि तिच्या कोवळ्या ओठांतून उमटलेली ती भीषण शिवी पाहून माझे हात क्षणभर स्क्रीनवरच थरथरले.

पण खरा धक्का तर पुढे बसणार होता. जेव्हा मी त्या व्हिडिओच्या खाली कमेंट्सचा पूर पाहिला, तेव्हा अंगावर काटा आला. लोक तिचे कौतुक करत होते! तिला 'बोल्ड', 'क्यूट', 'नखरेबाज' अशा शेलक्या विशेषणांनी नवाजले जात होते. दोनच दिवसांत माध्यम क्षेत्रातील विकृतीचे दुसरे रूप समोर आले. बातमीच्या आणि टीआरपीच्या भुकेल्या काही डिजिटल चॅनेलवाल्यांनी थेट त्या मुलीचे घर गाठले. कॅमेरे, माईक घेऊन तिची अशी मुलाखत घेतली जात होती, जणू तिने ऑलिम्पिकमध्ये पदक जिंकले आहे. एवढेच नव्हे, तर रील बनवणाऱ्या काही टोळ्या तर चक्क तिच्या हाताने केक कापून तिचे 'सेलिब्रेशन' करत होत्या.

डोक्यात विचारांचे एक भयंकर चक्र सुरू झाले. आपण एक समाज म्हणून नक्की कुठे चाललो आहोत? आपण कशाचे उदात्तीकरण करतोय? आणि कोणत्या विकृतीला 'कौतुकास्पद' ठरवून डोक्यावर घेतोय? लहानपण हे देवाघरच्या फुलांसारखं असतं, असं आपण आजवर ऐकत आणि अनुभवत आलो आहोत. निष्पाप, गोड, नितळ आणि निरागस. पण आजच्या या 'डिजिटल बाजारात' सर्वात आधी आणि सर्वात क्रूरपणे कोणाचा बळी जात असेल, तर तो याच निरागसतेचा! एका बाजूला रात्रंदिवस अभ्यास करणारी, मैदानी खेळात घाम गाळणारी, वक्तृत्व, विज्ञान स्पर्धा किंवा कला कौशल्यात प्रामाणिक मेहनत घेणारी मुले कुठेतरी कोपऱ्यात उपेक्षित राहतात. त्यांच्या पाठीवर कौतुकाची एक थापही पडत नाही. आणि दुसऱ्या बाजूला, केवळ एक अश्लील शिवी देऊन किंवा वात्रट बोलून एखादे मूल रातोरात 'व्हायरल स्टार' होते.

या भयानक ट्रेण्डचा शाळेत जाणाऱ्या इतर मुलांच्या बालमनावर काय परिणाम होत असेल, याचा कधी आपण विचार केला आहे का? त्या लहानग्यांचा तर हाच गैरसमज होणार ना, की "प्रामाणिकपणे अभ्यास करून किंवा शिस्तीत राहून समाजात असं फेमस होता येत नाही; प्रसिद्धी हवी असेल, तर वात्रटपणा आणि शॉर्टकटच महत्त्वाचा!" हा विचार नव्या पिढीला नैतिकतेच्या कोणत्या गर्तेत ढकलणारा आहे, याची कल्पनाच करवत नाही.

पण हा वेडेपणा केवळ एका रीलपुरता किंवा एका शिवीपुरता मर्यादित नाही. आजचा टीव्ही उघडा किंवा कुठल्याही शाळेचे सांस्कृतिक कार्यक्रम पाहा, तिथेही हेच विदारक चित्र दिसते. अवघ्या नऊ-दहा वर्षांच्या चिमुरड्या, ज्यांचे शरीर अजून पूर्ण विकसितही झालेले नाही, त्यांना अश्लील, शृंगाररस असणाऱ्या भोजपुरी गाण्यांवर किंवा 'मदन मंजिरी' सारख्या अस्सल शृंगारिक लावण्यांवर थिरकायला लावले जाते. त्यांच्या वयाला न शोभणारे ते हावभाव, तो तोकडा पेहराव आणि त्या अंगांगातून डोकावणारी व्यावसायिक कोरिओग्राफी... हे सर्व एका बाजूला सुरू असताना, त्याहूनही मोठी वेदना तेव्हा होते जेव्हा समोर बसलेले त्यांचेच आई-वडील आणि समाज कौतुकाने टाळ्या पिटत असतो, शिट्ट्या वाजवत असतो! लहान मुलांच्या आई-वडिलांना आपल्या मुलीला इतक्या घाईघाईने 'यौवनात' ढकलून तिचे प्रदर्शन मांडण्यात कोणता आनंद मिळतोय, देव जाणे.

मानसशास्त्रज्ञ आणि बालहक्क कार्यकर्ते यावर अत्यंत महत्त्वाची धोक्याची घंटा वाजवत आहेत. या ९-१० वर्षांच्या मुलांना आपण कोणत्या स्टेप्स करतोय, त्या गाण्याचा गर्भितार्थ काय आहे, याचे अजिबात भान नसते. त्यांना फक्त समोरच्यांच्या टाळ्या, शिक्षकांची शाब्बासकी आणि पालकांचा आनंद हवा असतो. पण या प्रसिद्धीच्या हव्यासापोटी आपण त्यांचे 'हायपर-सेक्स्युअलायझेशन' करत आहोत. सायबर तज्ज्ञ तर याहून पुढचा धोका सांगतात, अशा शृंगारिक व्हिडिओंवर इंटरनेटवरील विकृत मानसिकतेच्या लोकांच्या नजरा असतात, ज्यातून मुलांच्या सुरक्षिततेला मोठा धोका निर्माण होतो.

नुकतंच कर्नाटकच्या शिक्षण विभागाने शाळांमध्ये अशा अश्लील डान्सवर बंदी घालणारे परिपत्रक काढले, तसेच महाराष्ट्रातील जालना येथे शालेय कार्यक्रमातील वादग्रस्त गाण्यांमुळे चौकशीचे आदेश दिले गेले. हे प्रशासकीय कायदे आणि पोक्सो सारख्या नियमांचे बडगे नक्कीच गरजेचे आहेत. पण प्रश्न असा पडतो की, कायदा प्रत्येक घरातल्या मोबाईलवर आणि प्रत्येक पालकाच्या मानसिकतेवर कसा नियंत्रण ठेवणार?

जेव्हा समाजातला एखादा सुज्ञ नागरिक, एखादी 'प्रतिभा देशमुख' या विकृतीला जाहीर विरोध करते, किंवा सोशल मीडियावर यावर आपली स्पष्ट मतं मांडते, तेव्हा समाज तिलाच शहाणपण शिकवतो. एका कोसळत चाललेल्या सामाजिक संस्कृतीचा हा ऱ्हास आहे. ही केवळ एका कुटुंबाची किंवा एका मुलाची समस्या नसून संपूर्ण पिढी बरबाद करणारी एक मानसिक साथ आहे. सोशल मीडियाच्या 'लाइक्स' आणि 'व्ह्यूज'च्या नादात आपण आपल्याच घरात एका अशा पिढीला जन्म घालत आहोत, ज्यांच्याकडे स्क्रीनवर दाखवायला प्रसिद्धी असेल, कदाचित पैसाही असेल, पण जगण्यासाठी आवश्यक असलेली नैतिक मूल्ये, संस्कार आणि आत्मसन्मान मात्र पूर्णपणे हरवलेला असेल.

मुलांच्या कलागुणांना हक्काचे व्यासपीठ मिळालेच पाहिजे, लोकनृत्य ही आपली संस्कृती आहे आणि डान्स हा एक उत्तम शारीरिक व्यायाम व आनंदाचा स्रोत आहे, यात तिळमात्र दुमत नाही. पण कला आणि विकृती यामधील ती पुसट, नाजूक रेषा ओळखण्याची शहाणकी आता समाजाने आणि विशेषतः पालकांनी दाखवायलाच हवी. जोपर्यंत आपण स्वतः एक सजग नागरिक म्हणून अशा विकृत व्हिडिओंवर, रील्सवर 'सामूहिक बहिष्कार' टाकत नाही, तोपर्यंत डिजिटल माध्यमांचा हा भस्मासूर शांत होणार नाही.

वेळ अजूनही गेलेली नाही. चला, आपल्या मुलांच्या हातातील तो कॅमेरा आणि त्यांच्या चेहऱ्यावरचे ते उसने हावभाव थोडे दिवस बाजूला ठेवूया. त्यांना त्यांचे हक्काचे, मातीने माखलेले, खेळात रमणारे आणि निरागसतेने हसणारे बालपण परत देऊया. उमलण्यापूर्वीच फुलांना बाजारपेठेत आणून, त्यांचा सुवास ओरबाडण्याचा हा पालकांचा आणि माध्यमांचा आंधळा हव्यास आता कुठेतरी थांबायलाच हवा! अन्यथा, भविष्यात आपल्याकडे 'व्हायरल' झालेल्या माणसांची गर्दी तर असेल, पण 'संस्कारी' माणसांचा दुष्काळ पडलेला असेल.

– ९५६१५९४३०६

# मधल्या फळीने टिम इंडियाला दगा दिला

डॉ.दत्ता विघावे
क्रिकेट समिक्षक

सलग सहा टि २० सामने गमावल्यानंतर पहिला वनडे सामना जिंकलेली टिम इंडिया विजयी पथावर आली असे असताना दुसऱ्या वनडेत चांगल्या सुरुवातीनंतर मधली फळी धाडधाड कोसळल्याने भारताची या सामन्या बरोबरच मालिका खिशात घालण्याचे स्वप्न १९ जुलै पर्यंत लांबणीवर पडले.

जो रूटच्या शानदार नाबाद ९९ धावांच्या जोरावर इंग्लंडने दुसऱ्या एकदिवसीय सामन्यात भारतावर चार गडी राखून विजय मिळवत तीन सामन्यांची मालिका १-१ अशी बरोबरीत आणली. भारतासाठी विराट कोहली (६५) आणि श्रेयस अय्यर (६६) यांनी अर्धशतके झळकावली, परंतु रोहित शर्माची खराब फॉर्म आणि मधल्या फळीतील फलंदाजांच्या घसरणीमुळे संघ केवळ २३३ धावाच करू शकला.

गुरुवारी कार्डिफमधील सोफिया गार्डन्सवर झालेल्या दुसऱ्या एकदिवसीय सामन्यात, जो रूटच्या शानदार नाबाद ९९ धावांच्या खेळीमुळे इंग्लंडने भारतावर चार गडी राखून विजय मिळवला. या विजयामुळे तीन सामन्यांची एकदिवसीय मालिका १-१ अशी बरोबरीत आली आहे. आता मालिकेचा निकाल रविवारी लॉर्ड्सवर होणाऱ्या तिसऱ्या आणि अंतिम सामन्यात लागेल. प्रथम फलंदाजी करताना भारताने ४४ षटकांत २३३ धावा केल्या. प्रत्युत्तरात, इंग्लंडने ४४.१ षटकांत सहा गडी गमावून हे लक्ष्य पूर्ण केले.

रूटने चांगली फलंदाजी केली, पण त्याचे शतक हुकले. २३४ धावांचे लक्ष्य गाठताना इंग्लंडची सुरुवात खराब झाली. जसप्रीत बुमराहने बेन डकेटला लवकर बाद करून भारताला पहिले यश मिळवून दिले, तर प्रसिद्ध कृष्णाने जेकब बेथेलला बाद केले. हॅरी ब्रूक देखील गुरनूर ब्रारच्या गोलंदाजीवर अवघ्या १६ धावांवर बाद झाला.

एके वेळी इंग्लंडची धावसंख्या ५ बाद १२५ होती, पण अनुभवी फलंदाज जो रूटने संयमाने डाव सावरला. त्याने विल जॅक्स (३०) सोबत सहाव्या विकेटसाठी ७२ धावांची महत्त्वपूर्ण भागीदारी करून संघाला विजय मिळवून दिला. रूटने १३३ चेंडूंमध्ये नाबाद ९९ धावा केल्या. तो शतकापासून केवळ एक धाव दूर राहिला, पण गस अँटकिन्सनने चौकार मारून विजय निश्चित केला. सॅम करनने २६ धावांचे योगदान दिले, तर कर्णधार जोस बटलर ११ धावांवर अक्षर पटेलच्या गोलंदाजीवर बाद झाला.

भारतीय गोलंदाजांनी सुरुवातीलाच दबाव निर्माण केला. भारतीय वेगवान गोलंदाजांनी नव्या चेंडूने उत्कृष्ट कामगिरी केली. बुमराह, प्रसिद्ध कृष्णा आणि गुरनूर ब्रार यांनी सुरुवातीलाच धक्के देत इंग्लंडवर दबाव आणला. तथापि, त्यानंतर रूटने हुशारीने फलंदाजी करत भारतीय गोलंदाजांना पुनरागमन करण्यापासून रोखले. गुरनूरने दोन बळी घेतले, तर बुमराह, प्रसिद्ध, शिवम दुबे आणि अक्षर पटेल यांनी प्रत्येकी एक बळी घेतला.

### कोहली आणि अय्यर यांनी भारताच्या डावाला आधार दिला

यापूर्वी, नाणेफेक गमावून प्रथम फलंदाजी करण्याचा निर्णय घेतल्यानंतर, भारताचा संघ ४४ षटकांत २३३ धावांवर सर्वबाद झाला. भारतासाठी विराट कोहली आणि उपकर्णधार श्रेयस अय्यर हे सर्वाधिक धावा करणारे फलंदाज होते. कोहलीने आठ चौकारांसह ६६ चेंडूंमध्ये ६५ धावांची शानदार खेळी केली. त्याने सुरुवातीपासूनच आत्मविश्वासाने फलंदाजी केली आणि अनेक आकर्षक फटके खेळले. श्रेयस अय्यरने ७१ चेंडूंमध्ये ६६ धावा केल्या. त्याने इंग्लंडच्या वेगवान गोलंदाजांचे आखूड चेंडू उत्कृष्टपणे हाताळले आणि षटकार मारून आपले अर्धशतक पूर्ण केले. दोन फलंदाजांनी ६७ धावांची महत्त्वपूर्ण भागीदारी केली, पण त्यांच्या बाद झाल्यानंतर भारतीय मधली फळी पूर्णपणे कोसळली.

### रोहित शर्मा पुन्हा अपयशी

भारतीय संघासाठी सर्वात मोठी चिंता कर्णधार रोहित शर्माचा खराब फॉर्म ही होती. रोहित ४७ चेंडूंमध्ये केवळ २६ धावा करू शकला. त्याच्या खेळीत फक्त एका षटकाराचा समावेश होता आणि त्याला मोठ्या धावा करण्यासाठी संघर्ष करावा लागला. इंग्लंडच्या गोलंदाजांनी त्याच्यावर सतत दबाव ठेवला आणि अखेरीस, त्याने विल जॅक्सच्या गोलंदाजीवर जोस बटलरकडे एक सोपा झेल दिला. शुभमन गिलने ३१ धावा केल्या, तर इशान किशन केवळ एका धावेवर बाद झाला. खालच्या फळीतील वॉशिंग्टन सुंदर (२), अक्षर पटेल (१) आणि शिवम दुबे (०) यांना योगदान देता आले नाही. मधल्या फळीच्या घसरणीमुळे भारताने २६ चेंडूंमध्ये १५ धावांत चार गडी गमावले, ज्यामुळे त्यांना मोठी धावसंख्या उभारता आली नाही.

### इंग्लंडच्या गोलंदाजांची प्रभावी कामगिरी

इंग्लंडसाठी जोफ्रा आर्चर सर्वात यशस्वी गोलंदाज ठरला. त्याने १० षटकांत ४७ धावा देऊन तीन बळी घेतले आणि भारतीय फलंदाजांवर सतत दबाव कायम ठेवला. गस अँटकिन्सननेही तीन बळी घेतले, तर साकिब महमूदने दोन फलंदाजांना बाद केले.

### आता निर्णय लॉड्र्सवर घेतला जाईल

दुसऱ्या एकदिवसीय सामन्यातील विजयासह इंग्लंडने मालिका १-१ अशी बरोबरीत आणली आहे. दोन्ही संघांमधील तिसरा आणि निर्णायक सामना रविवारी ऐतिहासिक लॉड्र्स मैदानावर खेळला जाईल, जिथे मालिकेचा विजेता निश्चित होईल.

– ९०९६३७२०८२

# अण्णाभाऊ साठे : शब्दसाधनेचे फार मोठे तपस्वी

उपेक्षित गुन्हेगार म्हणून कलंकित ठरवले गेलेले, दलित आणि श्रमिक यांच्या समृद्धीचे स्वप्न अण्णाभाऊ पाहात आले. महामानव डॉ.बाबासाहेबांच्या लढाऊ आणि विमोचक विचारांचे संस्कार त्यांच्या मनावर खोलवर झालेले होते. जग बदल घालुनी घाव। सांगूनि गेले मज भीमराव॥ हे त्यांचे गीत खूप गाजले. त्यांनी लिहिलेल्या लावण्यांत माझी मैना गावावर राहिली आणि मुंबईची लावणी या अजोड आणि अविस्मरणीय आहेत.

अण्णाभाऊ ऊर्फ तुकाराम भाऊराव साठे यांची निरीक्षणशक्ती अत्यंत सूक्ष्म होती. त्यांच्या लेखन शैलीला मराठमोळा, रांगडा पण लोभस घाट आहे. नाट्यमयता हाही त्यांच्या लेखनशैलीचा एक खास गुण होता. ज्या विपर्यस्त जीवनातून अण्णाभाऊंनी अनुभव आत्मसात केले, त्यांतील क्षणांचा वेग आणि आवेग त्यांच्या लेखनात जाणवतो. लवचिक भावचित्रे अंगासरशा मोडीने साकार

एन. कृष्णकुमार
गडचिरोली

करण्याची त्यांची लकबही स्वतंत्र आहे. लेखनावर त्यांनी जीव जडवला होता; त्यांनी ते विपुल केले. रशियाच्या इंडो-सोव्हिएत कल्चरल सोसायटीच्या निमंत्रणावरून ते सन १९६१ साली रशियाला गेले. तेथील अनुभवांवर आधारित माझा रशियाचा प्रवास हे प्रवास वर्णन त्यांनी लिहिले. संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीत त्यांनी स्वतःला झोकून दिले होते. त्यांच्या शाहिरीत लावणी, पोवाडे, गीते, लोकनाट्ये आदींचा समावेश होता. महाराष्ट्राची परंपरा या नावाने त्यांनी या चळवळीसाठी पोवाडा लिहिला; त्याचप्रमाणे मुंबई कुणाची? या लोकनाट्याचे महाराष्ट्रभर प्रयोग केले. अकलेची गोष्ट, देशभक्त घोटाळे, शेटजींचे इलेक्शन, बेकायदेशीर, पुढारी मिळाला, लोकमंत्र्यांचा दौरा ही त्यांची अन्य काही लोकनाट्ये आहेत. अण्णाभाऊंनी पारंपरिक तमाशाला आधुनिक लोकनाट्याचे रूप दिले.

अण्णाभाऊ साठे हे कथा, कादंबरी, लोकनाट्य, नाटक, पटकथा, लावणी, पोवाडे, प्रवासवर्णन अशा वेगवेगळ्या साहित्यप्रकारांतील लेखन केलेले ख्यातनाम मराठी साहित्यिक होत. ब्रिटिश राज्यकर्त्यांनी गुन्हेगार म्हणून शिक्का मारलेल्या एका जमातीत त्यांचा जन्म दि.१ ऑगस्ट १९२० रोजी झाला. त्यांच्या वडिलांचे नाव भाऊराव सिधोजी साठे तर आईचे नाव वालबाई होते. त्यांचे मूळ नाव तुकाराम होते. त्यांचे जन्मस्थळ वाटेगाव, ता.वाळवा, जि.सांगली होय. त्यांचे शालेय शिक्षण झालेले नव्हते; तथापि त्यांनी प्रयत्नपूर्वक अक्षरज्ञान मिळविले. सन १९३२साली वडिलांसोबत ते मुंबईला आले. चरितार्थासाठी कोळसे वेचणे, फेरीवाल्यांच्या पाठीशी गाठोडे घेऊन हिंडणे, मुंबईच्या मोरबाग गिरणीत झाडूवाला म्हणून नोकरी, अशी मिळतील ती कामे त्यांनी केली. मुंबईत कामगारांचे



कष्टमय, दुःखाचे जीवन त्यांनी पाहिले व अनुभवलेही. त्यांचे संप, मोर्चे पाहून त्यांचा लढाऊपणाही त्यांनी अनुभवला. सन १९३६मध्ये भारतीय कम्युनिस्ट पक्षाचे नेते कॉ.श्रीपाद अमृत डांगे यांच्या प्रभावाखाली आल्यावर ते कम्युनिस्ट पक्षाचे क्रियाशील कार्यकर्ते झाले. मुंबईत विश्वरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकरांपासून स्वातंत्र्यवीर सावरकरांपर्यंत अनेक नेत्यांची भाषणे त्यांनी ऐकली. पक्षाचे कामही ते करीत होतेच; तथापि वडिलांच्या निधनानंतर कुटुंबाची सगळी जबाबदारी अंगावर पडल्याने ते पुन्हा आपल्या गावी आले. तेथे बापू साठे या चुलतभावाच्या तमाशाच्या फडात ते काम करू लागले. पुढे सन १९४२च्या चळवळीत सहभागी झाल्यामुळे ब्रिटिश सरकारने त्यांच्यावर पकड वॉरंट काढले. पोलिसांना चुकवीत ते मुंबईला आले. मुंबईत लोकशाहीर म्हणून त्यांचा लौकिक झाला. त्यावेळी अमर शेख या ख्यातनाम मराठी लोक शाहीरांबरोबर अण्णाभाऊंचेही नाव लोकशाहीर म्हणून गाजू लागले. त्यांनी लिहिलेला स्तालिनग्राडचा पवाडा सन १९४३ साली पार्टी या मासिकात प्रसिद्ध झाला. त्यांनी सन १९४४ साली शाहीर अमर शेख व गव्हाणकर यांच्या मदतीने लाल बावटा कलापथक स्थापन केले.

या कलापथकावर सरकारने बंदी घातली. अमळनेरचे अमर हुतात्मे आणि पंजाब-दिल्लीचा दंगा या त्यांच्या काव्यरचना सन १९४७ साली प्रसिद्ध झाल्या. पंजाब-दिल्लीचा दंगा या रचनेत सर्व प्रागतिक शक्तींना एकत्र येऊन शांतता प्रस्थापित करण्याचे आवाहन त्यांनी केले होते.

अण्णाभाऊंच्या साहित्यात त्यांची कथा-कादंबरीची निर्मितीही ठळकपणे नजरेत भरते. जिवंत काडतूस, आबी, खुळंवाडी, बरबाद्या कंजारी, चिरानगरची भुतं, कृष्णाकाठच्या कथा हे त्यांचे काही कथासंग्रह; त्यांनी पस्तीस कादंबऱ्या लिहिल्या. चित्रा ही त्यांची पहिली कादंबरी. त्यानंतर ३४ कादंबऱ्या त्यांनी लिहिल्या. त्यांत फकिरा, वारणेचा वाघ, चिखलातील कमळ, रानगंगा, माकडीचा माळ, वैजयंता यांसारख्या कादंबऱ्यांचा समावेश होतो. त्यांच्या फकिरा या कादंबरीला महाराष्ट्र शासनाचा पुरस्कार मिळाला. वास्तव, आदर्श आणि स्वप्नरंजन यांचे मिश्रण त्या कादंबरीत आहे. सत्प्रवृत्तीचा, माणुसकीचा विजय हे अण्णाभाऊंच्या कादंबऱ्यांचे मुख्यसूत्र होय. त्यांच्या या कादंबऱ्यांवर चित्रपटही निघाले- वैजयंता, टिळा लावते मी रक्ताचा, डोंगरची मैना, मुरली मल्हारीरायाची, वारणेचा वाघ, अशी ही साताऱ्याची तऱ्हा, फकिरा या शिवाय इनामदार, पेंग्याचं लगीन, सुलतान ही नाटकेही त्यांनी लिहिली. उपेक्षित गुन्हेगार म्हणून कलंकित ठरवले गेलेले, दलित आणि श्रमिक यांच्या समृद्धीचे स्वप्न अण्णाभाऊ पाहात आले. महामानव डॉ.बाबासाहेबांच्या लढाऊ आणि विमोचक विचारांचे संस्कार त्यांच्या मनावर खोलवर झालेले होते. जग बदल घालुनी घाव। सांगूनि गेले मज भीमराव॥ हे त्यांचे गीत खूप गाजले. त्यांनी लिहिलेल्या लावण्यांत माझी मैना गावावर राहिली आणि मुंबईची लावणी या अजोड आणि अविस्मरणीय आहेत. अतिशय तळमळीने लिहिण्याची त्यांची वृत्ती होती. पृथ्वी शेषाच्या मस्तकावर तरली नसून ती दलितांच्या तळहातावर तरलेली आहे, असे ते म्हणत. हाच त्यांच्या लेखनाचा प्रेरणा स्रोत होता. मानवी जीवनातील संघर्ष, नाटय, दुःख, दारिद्य त्यांच्या साहित्यातून प्रकट होते. त्यांच्या कथा-कादंबऱ्यांतून त्यांनी उभ्या केलेल्या माणसांत जबरदस्त जीवनेच्छा दिसते. त्यांच्यापासून प्रेरणा घेऊन दलित लेखकांची एक प्रतिभावान पिढी निर्माण झाली.

त्यात बाबूराव बागूल, नामदेव ढसाळ, लक्ष्मण माने, यशवंत मनोहर, दया पवार, केशव मेश्राम, शरणकुमार लिंबाळे आदींचा अंतर्भाव होतो. पुढे पुढे मात्र दारिद्य आणि एकाकी आयुष्य त्यांच्या वाट्याला प्रकर्षाने आले.

मराठी साहित्यातील प्रतिष्ठितांकडून त्यांची उपेक्षा झाली. विपन्नावस्थेत गोरेगाव-मुंबई येथे त्यांचे दि.१८ जुलै १९६९ रोजी निर्वाण झाले. मरणोपरांत महाराष्ट्रातील विद्यापीठांत अण्णाभाऊंवर अकरा प्रबंध सिद्ध केले आहेत. पुणे विद्यापीठात त्यांच्या सन्मानार्थ अण्णाभाऊ साठे अध्यासन सुरू करण्यात आले आहे. त्यांच्या कथा-कादंबऱ्यांची केवळ भारतीयच नव्हे, तर २२ परकीय भाषांत भाषांतरे झाली आहेत.

– ९६९९८३६७१७

सिंहवाणी वृत्त हे मराठी, हिंदी भाषेतील दैनिक वृत्तपत्र प्रकाशक, मुख्य संपादक अजय दिलीपराव बिवडे यांनी हाऊस नं. ५८४२, प्लॉट नं ५२, जुने ज्ञानेश्वर नगर, मानेवाडा रोड, नागपूर (महाराष्ट्र)-४४००२७ येथून प्रकाशित केले असून मुद्रक मुद्रक अव्दैत प्रकाश चव्हाण, अव्दैत प्रिंटर्स, ग्रीन सिटी-३, वर्धा रोड, गौसी मानापूर, नागपूर-४४११०८ (महाराष्ट्र) येथून मुद्रित केले आहे. संपर्क क्र. ८६९८७८८६६६ - मेल आयडी : sinhvanivrutta@gmail.com (Reg. No : MHBIL/25/A4140)

# लोकसहभागातून नागपूरसह जिल्ह्यात १० लक्ष वृक्षारोपणाचा 'महासंकल्प'

## केंद्रीय मंत्री नितीन गडकरी, महापौर निता ठाकरे यांनी घेतला पुढाकार

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

निरामय जीवन जगण्यासाठी पर्यावरणपूरक वातावरणाची आवश्यकता असून, वृक्षारोपणाची चळवळ लोकचळवळीचे स्वरुप लाभावे, यासाठी सर्वांनी आपले योगदान देण्याचे आवाहन केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी केले. नागपूर महानगरपालिका, नागपूर सुधार प्रन्यास, नागपूर जिल्हाधिकारी कार्यालय, नागपूर जिल्हा परिषद आणि ग्रीन फाउंडेशन नागपूर यांच्या संयुक्त विद्यमाने पर्यावरण संवर्धनासाठी नागपूर शहर व जिल्ह्यात १० लक्ष वृक्ष लागवडीचा संकल्प करण्यासाठी आयोजित बैठकीत ते बोलत होते.

कविवर्य सुरेश भट सभागृहात आयोजित बैठकीत मनपाच्या महापौर निता ठाकरे, आमदार कृष्णा खोपडे, मोहन मते, प्रवीण दटके, उपमहापौर लिला हाथीबेड, स्थायी समिती सभापती शिवानी दाणी-वखरे, मनपा आयुक्त डॉ. विपीन, जिल्हा परिषद नागपूरचे मुख्य कार्यकारी अधिकारी विनायक महामुनी, पोलीस अधीक्षक हर्ष पोद्दार, उप वनसंरक्षक विनीता व्यास, माजी महापौर दयाशंकर तिवारी, माजी आमदार प्रा. अनिल सोले, मनपाचे अतिरिक्त आयुक्त अंकित, मुरुगानंथम एम., मिलिंद मेश्राम, रा.तू.म. नागपूर विद्यापीठाचे प्रकुलगुरु अखिलेश पेशवे ग्रीन फाउंडेशनचे डॉ. सतीश वटे, निशांत गांधी, पर्यावरण तज्ज्ञ दिलीप चिंचमालातपुरे, डॉ. गारवे, डॉ. कलंत्री धनंजय बापट, एमआयएमचे शकील पटेल, मुस्लिम लिगचे असलम मुल्ला खान, उपेंद्र कोठेकर, नासुप्रचे अधीक्षक अभियंता भांडारकर, दै. तरुण भारतचे मुख्य संपादक शैलेश पांडे, माजी नगरसेविका प्रगती पाटील आदी उपस्थित होते.

यावेळी केंद्रीय मंत्री नितीन गडकरी पुढे म्हणाले की, सर्वांना शुद्ध आणि स्वच्छ हवा मिळण्यासाठी वृक्षारोपणाचा हा महासंकल्प आपण येत्या १ ते ३० ऑगस्ट दरम्यान राबविण्यात येणार असून, यादरम्यान लावण्यात आलेल्या वृक्षारोपणाद्वारे शहराचे हिरवे आच्छादनात कितपत वाढ झाली याची चाचपणी देखील केली जाणार आहे. वृक्षारोपणाच्या या महासंकाल्पात सर्व नगरसेवक, शाळा, महाविद्यालयाचे प्राचार्य, शिक्षकवृंद, पोलीस कर्मचारी यांनी देखील सक्रीय सहभाग नोंदविण्याचे आवाहन गडकरी यांनी केले.

महापौर निता ठाकरे यांनी सांगितले की, आजचा दिवस आपल्या नागपूर शहराच्या इतिहासात एका नव्या हरित क्रांतीची सुरुवात करणारा दिवस ठरणार आहे. आपले लाडके नागपूर ही केवळ महाराष्ट्राची उपराजधानी नाही, तर ते संपूर्ण देशातील एक आदर्श, सुंदर आणि पर्यावरणपूरक शहर बनावे, यासाठी आज आपण सर्वजण मिळून एक ऐतिहासिक पाऊल उचलत आहोत. याचा मला आनंद आहे. नागपूर महानगरपालिका क्षेत्रात पर्यावरण संवर्धनासाठी '५ लक्ष वृक्षारोपणाचा' जो भव्य आणि महत्त्वाकांक्षी निर्धार आपण केला होता, आज त्या वृक्षारोपणाचा महासंकल्प सोहळा साजरा करताना मला मनापासून आनंद आणि अभिमान वाटत असल्याचे त्यांनी सांगितले.

माजी महापौर दयाशंकर तिवारी यांनी नागपूर महानगरपालिकातर्फे केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांच्या संकल्पनेने मागच्या काही वर्षात पर्यावरण संरक्षणासाठी केले गेलेले कामाची माहिती सर्वांना दिली. त्यांनी सांगितले की पाणी, ध्वनी, वायू प्रदूषणासाठी निर्मूलन करण्यासाठी गडकरी जी संकल्पबद्ध आहे.



ग्रीन फाऊंडेशनचे प्रमुख डॉ. सतीश वटे म्हणले की, नागपूर शहर हिरवे करण्यासाठी वृक्षारोपणाची गरज आहे. मनपाच्या वृक्षारोपणाच्या अभियानासाठी ग्रीन फाउंडेशन तांत्रिक सहाय्य दिले जाईल. हे शहर सर्वात हिरवेगार शहर करण्याची गरज आहे. प्रदूषण नियंत्रणासाठी झाडांची लागवड आवश्यक आहे. याशिवाय मोईलकडून लोखंडी कठडे दिले जाणार आहे.

याप्रसंगी केंद्रीय मंत्री नितीन गडकरी आणि महापौर निता ठाकरे यांच्या हस्ते वन विभागाचे प्रधान मुख्य संरक्षक श्रीनिवास राव, वेस्टर्न कोल फील्डचे महाप्रबंधक श्री. जॉन, मॉयलचे सीएमडी वी. सुरेश यांच्या सत्कार करण्यात आला. या प्रत्येकी पाच लक्ष वृक्ष देण्याचे संकल्प केले आहे. तसेच रायसोनी ग्रुप, दिलीप चिंचमलतपुरे, प्रीतीश आंभरे यांचा सुद्धा सत्कार करण्यात आला. यावेळी पर्यावरण संवर्धनाची प्रतिज्ञा महापौर निता ठाकरे यांनी उपस्थितांना दिली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन विष्णू चांगदे यांनी तर आभार जी गुरुप्रसाद यांनी व्यक्त केले.

हा महासंकल्प यशस्वी करण्यासाठी मनपा, नागपूर सुधार प्रन्यास, जिल्हा प्रशासन, डॉ. पंजाबराव देखमुख कृषी विद्यापीठ नागपूर, राज्य राखीव पोलीस दल, केंद्रीय राखीव पोलीस दल, वेस्टर्न कोल फिल्ड लि. खनिज अन्वेषण आणि सल्लागार मर्या., मगनीज ओर इंडिया लि., नागपूर महानगर प्रदेश विकास प्राधिकरण, सार्वजनिक बांधकाम विभाग, सामाजिक वनीकरण विभाग, महानगरपालिका नागपूर शाळा, महाविद्यालय, डॉक्टर असोसिएशन, कंत्राटदार असोसिएशन, इंडस्ट्रीज असोसिएशन, बिल्डर्स असोसिएशन, हॉटेल्स व्यावसायिक असोसिएशन, गणपती मंडळ, दुर्गात्सव मंडळ, सामाजिक संस्था/ शासकीय कार्यालय, बँका आदी सहकार्य करणार आहेत.

## इनर व्हील क्लब ऑफ नागपूर ऑरेंज सिटीच्या नवीन कार्यकारिणीचा पदग्रहण समारंभ उद्या

### अध्यक्षपदी स्मिता बागडदेव तर सचिवपदी मोनिका वारोतकर





**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

इनर व्हील क्लब ऑफ नागपूर ऑरेंज सिटीच्या वर्ष २०२६-२७ या सत्रासाठी नव्याने निवड झालेल्या कार्यकारिणीचा पदग्रहण समारंभ रविवारी १९ जुलै रोजी आयोजित करण्यात आलेला आहेत.

या समारंभाला इनर व्हील डिस्ट्रिक्ट ३०३ च्या जिल्हाध्यक्षा मनीषा चौधरी या प्रमुख पाहुण्या म्हणून उपस्थित राहणार असून प्रियंका ठाकूर या सन्माननीय अतिथी म्हणून उपस्थित राहतील. यावेळी नव्या कार्यकारिणीकडे पदभार सोपविण्याचा औपचारिक सोहळा पार पडणार आहे. नवीन कार्यकारिणीच्या अध्यक्षा म्हणून सौ. स्मिता बागडदेव, आयपीपी डॉ. शारदा रोशनखेडे, उपाध्यक्षा राधा पटेल, सचिव मोनिका वारोतकर, कोषाध्यक्षा सुप्रिया पाठक, आयएसओ वैशाली चिंचोलकर, संपादक सीमा मेटांगळे तसेच सीसीसीसी कोमल अकबरी यांची निवड झाली आहे.

कार्यकारी प्रतिनिधी म्हणून रीता रावका, प्रीती जैन, मनीषा जैन, प्रीती नवले आणि ममता वालदे या कार्यरत राहणार आहेत. या पदग्रहण समारंभास इनर व्हीलच्या पदाधिकाऱ्यांसह विविध क्लबच्या सदस्यांची मोठ्या संख्येने उपस्थिती अपेक्षित आहे. नव्या कार्यकारिणीच्या नेतृत्वाखाली महिला सक्षमीकरण, सामाजिक बांधिलकी, शैक्षणिक उपक्रम तसेच विविध सेवाभावी कार्यक्रमांना अधिक गती मिळेल, असा विश्वास क्लबच्या वतीने व्यक्त करण्यात आला आहे.

## गुरुंच्या भेटीचे औचित्य साधत माजी विद्यार्थ्यांकडून विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य भेट

### 'गुरुदक्षिणेचा अनोखा आदर्श', सुळे हायस्कूलच्या २००२ बॅचच्या माजी विद्यार्थ्यांकडून शैक्षणिक साहित्याचे वाटप



**दै. सिंहवाणी वृत्त, वाडी**

"गुरुंचे ऋण समाजसेवेतून फेडायचे" या भावनेतून सुळे हायस्कूल, धंतोली (मेहाडिया चौक), नागपूर येथील २००२ बॅचच्या माजी विद्यार्थ्यांनी एक प्रेरणादायी सामाजिक उपक्रम राबविला. सुळे हायस्कूलमधील त्यांचे तीन शिक्षक समायोजनातून वडधामना येथील स्वामी विवेकानंद हायस्कूल येथे कार्यरत झाल्यानंतर गुरुंच्या भेटीच्या निमित्ताने माजी विद्यार्थ्यांनी तेथील विद्यार्थ्यांना शालेय उपयोगी वस्तू, पुस्तके आणि शालेय गणवेशाचे वाटप करून शिक्षणासाठी मोलाची मदत केली.

या उपक्रमात कुणाल मानकर (सीआयएसएफ अधिकारी), जयेश मेंढे (नॅशनल इन्शुरन्स कंपनी अधिकारी), विनोद कुंजाम (अँटी करप्शन अधिकारी), प्रशांत मोरे (मेडिकल लॅब टेक्निशियन), निलेश मेश्राम (डीआयडी फेम डान्स शो उपविजेते २०१५-१६), निलेश गजभिये (आयटी रिलेशन व्यवसाय), कुशल वासनिक (खुशबू असोसिएट्सचे जॉइंट डायरेक्टर), विजय राऊत (विंडो मेकर व्यवसाय), संदीप खेवले, संदीप सहारे (एसटी महामंडळ अधिकारी) आणि संदीप सुरजबन्सी (प्रायव्हेट कंपनी मॅनेजर) यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला. कार्यक्रमाला संस्थेचे सचिव नामदेवराव नागोसे, कोषाध्यक्ष चंद्रभान हुलके, मुख्याध्यापक ज्ञानेश्वर डायगव्हाणे तसेच सहशिक्षक सेवेंद्र सहारे, मनोज बागडे, निलेश बाभुळकर, लता सूर्यवंशी आणि शिल्पा जगनाडे यांची प्रमुख उपस्थिती लाभली. यावेळी मान्यवरांनी माजी विद्यार्थ्यांच्या या उपक्रमाचे मनापासून कौतुक करत, "गुरु-शिष्य नात्याचा सन्मान आणि समाजाप्रती असलेली जबाबदारी अशा उपक्रमांतून अधिक दृढ होते. विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी प्रोत्साहन देण्याबरोबरच सामाजिक जाणीवही निर्माण होते," असे मत व्यक्त केले.

शालेय साहित्य व गणवेश मिळाल्याने विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर आनंद खुलला. २००२ बॅचच्या माजी विद्यार्थ्यांनी भविष्यातही अशाच शैक्षणिक व समाजोपयोगी उपक्रमांचे सातत्य राखण्याचा निर्धार व्यक्त केला.

## थोडक्यात

### प्रमिलाबाई वामनराव काळबांडे यांचे निधन

**दै. सिंहवाणी वृत्त, सावरगाव**



सावरगाव येथील आदर्श शिक्षिका व माजी जिल्हा परिषद सदस्या प्रमिलाबाई वामनराव काळबांडे यांचे वयाच्या ७६ व्या वर्षी, १७ जुलै रोजी, नागपूरला दुःखद निधन झाले. त्या दैनिक सकाळ वृत्तपत्राचे संपादक प्रमोद काळबांडे तसेच शिक्षक प्रशांत काळबांडे यांच्या मातोश्री होत. त्यांच्या पश्चात तीन मुले, एक मुलगी, जावई, सुना, नातवंडे असा बराच मोठा आप्तपरिवार आहे. त्यांच्यावर शुक्रवारी सावरगाव मोक्षधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले.

### सुरेशराव वशिष्ठ यांचे निधन

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**



२०३, डेफोडील, लाईफ स्टाईल सोसायटी येथील रहिवासी, एबीपी माझाचे विदर्भ प्रमुख रजत वशिष्ठ यांचे वडील सुरेशराव वशिष्ठ यांचे आज शुक्रवारी १७ जुलै रोजी, सकाळी ८ वाजता दुःखद निधन झाले. मृत्युसमयी त्याचं वय ८३ होते. त्यांच्या निधनाने वशिष्ठ कुटुंबावर शोककळा पसरली असून पत्रकारिता क्षेत्रातही हळहळ व्यक्त केली जात आहे. अंतिम संस्कार अंबाझरी घाटावरील करण्यात आले.

### मोरया फाउंडेशनतर्फे भव्य ज्येष्ठ नागरिक सत्कार सोहळा व नृत्य स्पर्धा आज

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

मोरया फाउंडेशनच्या वतीने समाजातील ज्येष्ठ नागरिकांचा सन्मान करण्याच्या उद्देशाने शनिवार, दि. १८ जुलै ला दुपारी १२ वाजता. अमरनगर समाज भवन येथे, हनुमान मंदिर, चिखलीचा राजा रोड येथील भव्य ज्येष्ठ नागरिक सत्कार सोहळा व नृत्य स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. या कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून आमदार मोहन मते उपस्थित राहणार असून त्यांच्या हस्ते ज्येष्ठ नागरिकांचा सत्कार करण्यात येणार आहे. समाजातील ज्येष्ठांच्या कायार्चा गौरव करून त्यांच्याप्रती कृतज्ञता व्यक्त करण्याच्या उद्देशाने हा उपक्रम राबविण्यात येत असल्याची माहिती आयोजकांनी दिली.

कार्यक्रमाला प्रमुख उपस्थिती म्हणून मंगलाताई खेकरे (सभापती, परिवहन समिती, नागपूर महानगर), बाबाराव तायडे (नगरसेवक, प्रभाग ३४), सूरज गोजे (शिवसेना जिल्हाप्रमुख व मनोनीत नगरसेवक), मुकेशभाऊ रेवतकर (अध्यक्ष, दक्षिण नागपूर राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष) तसेच अर्पणा सुनील मानेकर (मानिनी सखी मंच) उपस्थित राहणार आहेत. कार्यक्रमाचे आयोजन मोरया फाउंडेशनच्या संस्थापिका व सचिव रजनी अविनाश चौहान यांनी केले असून, या कार्यक्रमाला ज्येष्ठ नागरिक, महिला, युवक तसेच नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून कार्यक्रमाची शोभा वाढवावी, असे आवाहन आयोजकांतर्फे करण्यात आले आहे.

### शिधापत्रिकेचे ऑनलाईन संलग्नीकरण तातडीने करा!

#### सुधीर पारवेंची जिल्हाधिकाऱ्यांकडे मागणी




**दै. सिंहवाणी वृत्त, भिवापूर**

जिल्ह्यातील सर्व तालुक्यांमध्ये शिधापत्रिकेत नव्याने नावे समाविष्ट केलेल्या लाभार्थ्यांचे ऑनलाईन संलग्नीकरण रखडल्याने आयुष्मान भारत कार्ड काढण्यात मोठी अडचण निर्माण झाली आहे. ही प्रक्रिया तातडीने पूर्ण करावी अशी मागणी माजी आमदार सुधीर पारवे यांनी गुरुवारी १७ जुलै रोजी जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांच्याकडे केली. निवेदनात म्हटले आहे की, नागपूर जिल्ह्यातील सर्व तालुक्यांमध्ये बऱ्याच नागरिकांनी शिधापत्रिकेत नव्याने नावे समाविष्ट केली आहेत. मात्र तालुका पुरवठा विभागामार्फत अद्यापही त्यांचे ऑनलाईन संलग्नीकरण झालेले नाही. अन्न व नागरी पुरवठा विभागाकडून "आयुष्मान भारत कार्ड काढल्याशिवाय रेशन मिळणार नाही" असे सांगण्यात येत आहे. परंतु ऑनलाईन संलग्नीकरणच झाले नसल्याने लाभार्थ्यांना आयुष्मान कार्ड काढता येत नाही.

जिल्ह्यातील सर्व तालुक्यांमध्ये ऑनलाईन संलग्नीकरणाचे काम अतिशय संथ गतीने सुरू आहे. सर्व्हर डाऊन असणे किंवा लाभार्थ्यांचे आधार अपडेट नसल्यामुळे ही प्रक्रिया रखडली आहे. त्यामुळे नव्याने नोंदणी केलेल्या सर्व लाभार्थ्यांची नावे शिधापत्रिकेत तातडीने ऑनलाईन संलग्न करावीत अशी मागणी पारवे यांनी केली आहे. निवेदन देताना तुडका ग्रामपंचायतीचे सरपंच धनराज सहारे, वेलसाखरा ग्रामपंचायतीचे सरपंच संजय मेश्राम यांच्यासह अन्य पदाधिकारी उपस्थित होते.

### 'ज्ञानियांचा कल्पतरू - जगतगुरू आद्यशंकराचार्य' या पुस्तकाचे आज प्रकाशन

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

प्रस्थानत्रयीचे महान भाष्यकार, केवलाद्वैतवादाचे प्रवर्तक आद्यशंकराचार्य यांच्या जीवनकार्यावर प्रकाश टाकणारे, डॉ. सदानंद पिंप्रीकर लिखित 'ज्ञानियांचा कल्पतरू - जगतगुरू आद्यशंकराचार्य' या पुस्तकाचा प्रकाशन सोहळा शनिवार, दि. १८ जुलै रोजी आयोजित करण्यात आला आहे. चिटणवीस सेंटर येथील मिमोसा सभागृहात संध्याकाळी ६.३० वाजता आयोजित या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी ज्येष्ठ निवेदक, वक्ता आणि संत साहित्याचे अभ्यासक प्रकाश एदलाबादकर राहतील. संस्कृत विदुषी डॉ. विभा क्षीरसागर यांची प्रमुख उपस्थिती राहणार असून त्या पुस्तकावर भाष्य करतील. आध्यात्मिक क्षेत्रातील अभ्यासक पुण्याचे जयंत अरगडे यांची विशेष उपस्थिती राहील. आद्यशंकराचार्यांचं जीवन आणि त्यांनी सांगितलेले अध्यात्म यांचा अनुबंध पुन्हा अधोरेखित करण्याचा प्रयत्न नचिकेत प्रकाशनाची निर्मिती असलेल्या या पुस्तकातून लेखकाने केला आहे. रसिकांनी या प्रकाशन सोहळ्याला उपस्थित राहावे, असे आवाहन वृषाली देशपांडे यांनी केले आहे.

## अनुसुचित जातीच्या आरक्षणाचे उपवर्गीकरण करून भांडणे लावणे थांबवा अन्यथा परिणाम भोगावे लागेल : दिगांबर डोंगरे

### काटोल येथे आज हजारो भीमसैनिकांचा निघाला महाएल्गार मोर्चा,आरक्षण बचाव कृती समिती व सैनिक दलाच्या हजारो महिला सैनिक ड्रेस कोडमध्ये मोर्चाचे आकर्षण होते

**दै. सिंहवाणी वृत्त, काटोल**

अनुसुचित जातीच्या आरक्षणाचे उपवर्गीकरण करून जाती जातीत भांडणे लावण्याचे षडयंत्र महाराष्ट्र सरकारने चालू केले आहे. या विरोधात आज काटोल येथे महाएल्गार मोर्चाचे बहुजन वंचित क्रांति सेनेचे जिल्हा अध्यक्ष तथा न प काटोलचे माझी सभापती दिगांबर डोंगरे सहसंयोजक व सामाजिक कार्यकर्ते हर्षद बनसोड नगरसेविका प्रज्ञाताई डोंगरे समता सैनिक दलाच्या जिल्हा अध्यक्षा सुजाता डाबरासे यांच्या नेतृत्वात हजारो भीमसैनिकांच्या उपस्थितीत निघाला.




डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याला दिगांबर डोंगरे हर्षद बनसोड व प्रज्ञा डोंगरे यांच्या हस्ते माल्यार्पण करून मोर्चाला सुरवात करण्यात आली. हा मोर्चा आंबेडकर चौक ते रेस्ट हाऊस ते बसस्टॉप ते कपडा लाइन ते शास्त्री चौक ते आंबेडकर चौकापर्यन्त मोर्चा निघाला त्यानंतर तिथे निषेध सभा ज्येष्ठ आरपीआयचे नेते भीमराव बनसोड यांच्या अध्यक्षतेखाली घेण्यात आली.

याठिकाणी दिगांबर डोंगरे हर्षद बनसोड नगरसेविका प्रज्ञा दिगांबर डोंगरे यांनी सांगितले की जर का डॉ. बाबासाहेब आंबेडकरानी महिलांना आरक्षण दिले नसते तर मी सामान्य घरची बाई नगरसेविका झाले नसते असे सांगितले. कृष्णा गवईकर, उत्तमराव दुपारे, राहूल गजभिये, नरेंद्र डोंगरे, सुजाता डाबरासे, विजय दहाट, दीपाली गौरखेडे, सुनंदा जाधव, मिना पाटील, जाणराव गावंडे, सुरेश देशभ्रतार, धर्माजी पाटील खेमराज नारनवरे यांनीही सभेला संबोधित केले. तर दिगांबर डोंगरे यांनी सांगितले की आरक्षणाचे उपवर्गीकरण जर झाले तर दलीत समाजात जाती जातीत भांडणे लागेल सुशिक्षित तरुण आत्महत्या करतील दलीत समाजाला राजकीय नेतृत्व मिळणार नाही समाजात असंतोष निर्माण होईल हे अतिशय नुकसानदायक ठरेल. तेव्हा महाएल्गार मोर्चाच्या माध्यमातून सरकारला इशारा देण्यात येते की उपवर्गीकरणाचा निर्णय त्वरित मागे घ्यावा अन्यथा परिणाम भोगावे लागेल असे दिगांबर डोंगरे यांनी सांगितले.

तर भीमरावजी बनसोड यांनी अनुसुचित जातिच्या आरक्षणाचा इतिहास सांगितला त्यानंतर मागण्याचे निवेदन तहसीलदार आभा वाघमारे यांच्या मार्फत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना देण्यात आले. मोर्चा यशस्वी करण्यासाठी दिगांबर डोंगरे, हर्षद बनसोड, कृष्णा गवईकर, विजय दहाट पुन्नुदान निस्वादे, दिनेश निकोसे, श्रीधरजी सोमकुंवर, उत्तमराव दुपारे, सुनील मुन, सुनिल फाटे, ललित चोखांद्रे, राजेंद्र बागडे, संभाजी सोनुले, ललिता दुपारे, ज्योत्स्ना तायवाडे, निलिमा बागडे, रंजना ढोके, एकनाथ पाटील, वैशाली दलाल, नरेश रक्षित, रोशन भगत, दिनेश बोरकर, राजेंद्र बागडे यांनी अथक परिश्रम घेतले.

थोडक्यात

## सोनम वांगचूक यांच्या आंदोलनाला नवनिर्माण बहुउद्देशीय संस्थेचा नागपुरातून जाहीर पाठिंबा




**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

सामाजिक कार्यकर्ते सोनम वांगचूक यांच्या देशहिताच्या विचारांना आणि शांततामय आंदोलनाला नवनिर्माण बहुउद्देशीय संस्था, नागपूर यांनी जाहीर पाठिंबा दर्शविला आहे. केंद्र सरकारने सोनम वांगचूक यांच्याशी सकारात्मक चर्चा करून देशासमोरील विविध समस्यांवर त्यांच्या अनुभवाचा व बुद्धिमत्तेचा उपयोग करून घ्यावा, अशी मागणी संस्थेने केली आहे. संस्थेचे प्रवक्ते मनोज मालवी यांनी प्रसिद्धीस दिलेल्या पत्रकात म्हटले आहे की, सोनम वांगचूक हे एक सामाजिक कार्यकर्ते, विचारवंत आणि बुद्धिजीवी असून त्यांनी देशहितासाठी अनेक विधायक कल्पना मांडल्या आहेत. त्यामुळे त्यांच्या आंदोलनाकडे दुर्लक्ष न करता सरकारने त्यांच्याशी संवाद साधावा. पत्रकात पुढे नमूद करण्यात आले आहे की, ज्या प्रकारे समाजहिताच्या आंदोलनांमुळे जनजागृती होते, त्याचप्रमाणे सोनम वांगचूक यांचे आंदोलनही सकारात्मक उद्देशाने सुरू असून सरकारने त्यांच्या सूचनांचा गांभीर्याने विचार करावा. विशेषतः शिक्षण, उद्योग, शेती, परिवहन, रोजगार निर्मिती, क्रीडा तसेच सुरक्षा क्षेत्राच्या विकासासाठी त्यांच्या कल्पना उपयुक्त ठरू शकतात, असे संस्थेचे मत आहे.

सोनम वांगचूक यांच्या उपोषणाला १९ दिवस पूर्ण झाले असून त्यांची प्रकृती खालावत असल्याची चिंता संस्थेने व्यक्त केली आहे. अनेक मान्यवरांनीही त्यांना उपोषण मागे घेण्याचे आवाहन केले असले तरी, केंद्र सरकारने तातडीने चर्चा करून त्यांच्या मागण्यांवर सकारात्मक निर्णय घ्यावा, अशी मागणी नवनिर्माण बहुउद्देशीय संस्थेने केली आहे. या पत्रकावरील संस्थेचे अध्यक्ष चंद्रकांत मोखरे, संस्थापक अध्यक्ष रवी गाडगे पाटील आणि प्रवक्ते मनोज मालवी यांची नावे नमूद आहेत.

## नवनिर्वाचित आमदार डॉ.राजीव पोतदार यांचा वाडी नप. तर्फे सत्कार

**न.प.वाडीच्या समस्या प्राधान्याने सोडवविणार! : आमदार डॉ.राजीव पोतदार, वाडी नप.च्या आढावा बैठकीत दिले आश्वासन**



**दै. सिंहवाणी वृत्त, वाडी**

वाडी नगर परिषद कार्यालयाच्या सभागृहात (दि.१७ जुलै)संपन्न झालेल्या आढावा बैठकीत स्थानिक स्वराज्य संस्थां-विधान परिषदेचे नवनिर्वाचित आमदार डॉ.राजीव पोतदार यांचा वाडी नगर परिषद तर्फे भावपूर्ण सत्कार करण्यात आला. वाडी नगरपरिषदेचे नगराध्यक्ष नरेश चरडे यांच्या अध्यक्षतेखाली उपाध्यक्ष कल्पना सगदेव, जिल्हा नियोजन समिती चे आदर्श पटले,माजी जि.प.सदस्या उज्वला बोढारे,सत्ता पक्षनेता केशव बांदरे,विपक्ष गटनेता श्याम मंडपे,मोहपा चे माजी नगराध्यक्ष ईमेश्वर यावलकर यांच्या उपस्थितीत नवनिर्वाचित आमदार डॉ.राजीव पोतदार यांचा सन्मानचिन्ह,शाल,श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला.तदनंतर आढावा बैठकिच्या प्रस्तावनेत नगराध्यक्ष नरेश चरडे यांनी वाडी नप.क्षेत्रातील झालेल्या विकास कामांचा आढावा घेऊन महत्वपूर्ण पण प्रलंबित असलेल्या विकास कामात येणाऱ्या अडचणी स्पष्ट करून वाडी च्या विकासाकरिता सहकार्याची अपेक्षा व्यक्त केली.

सत्काराला उत्तर देताना आमदार डॉ.राजीव पोतदार यांनी वाडी च्या प्रलंबित विकास कामांसाठी प्राधान्याने निधी उपलब्ध करून देण्याचे आश्वासन दिले.कार्यक्रमाचे संचालन व आभार उपमुख्याधिकारी गौरव गाडगे यांनी केले. कार्यक्रमात बांधकाम सभापती दिनेश कोचे,पा.पु.सभापती विजय मेंढे,आरोग्य सभापती सरिता यादव,शिक्षण सभापती ज्योती भोरकर, उपसभापती रेखा रोडे,उपगटनेता राजेश जंगले यांचे सह सर्व नगरसेवक, नगरसेविका, नगर परिषद अधिकारी, कर्मचारी आणि स्थानिक भाजप अधिकाऱ्यांनी ही पुष्पगुच्छ देऊन त्यांचे अभिनंदन केले.

## नेहरूनगर झोन सभापती आढावा सभा



**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

नेहरूनगर झोन सभापती सीमा ढोमणे यांनी शुक्रवारी(ता.१७) झोन कार्यालयात सर्व अधिकारी कर्मचारी यांची आढावा सभा घेतली. सभेला नगरसेवक विजय झलके, प्रविण गिऱ्हे, शकील पटेल, निलेश गायधने, नगरसेविका दिव्या धुरडे, तसनीम परबीन नियामत खान ताजी, रजनी वानखेडे, शारदा बारई, वर्षा डोंगरे यांच्यासह सहायक आयुक्त विकास रायबोले, आसलकर, नायक तसेच प्रभागातील सर्व स्वच्छाता निरीक्षक, कनिष्ठ अभियंता उपस्थित होते. सभेत पाणी समस्या, रस्त्यावरील खड्डे, नाले सफाई, धुर फवारणी, पाण्याचे वाढीव बिल, पावसाळा पूर्व तयारी, कचरा समस्या, चोकेज समस्या यावर चर्चा करून सभापती श्रीमती ढोमणे यांनी झोन मध्ये चोकेज गाडया, मडपंपाची व्यवस्था करण्याच्या सूचना दिल्या. तसेच झोन मध्ये प्रभाग २६ , २७, २८, २९ आणि ३० साठी सोमवार २० ते २८ जुलै दरम्यान सकाळी ८ ते १२ वाजता दरम्यान एसआयआर शिबीर घेण्याचे नियोजित केले.

# स्वच्छतागृहाच्या दुरवस्थेमुळे विद्यार्थ्यांच्या सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर

**पालक विलास चरपे यांचे निवेदन, नगराध्यक्षांची तातडीची पाहणी, दोषींवर कारवाईची मागणी**

**दै. सिंहवाणी वृत्त, नरखेड**

पी. एम. श्री. नगर परिषद उच्च प्राथमिक शाळा क्र. १ व नगर परिषद हायस्कूल, नरखेड येथील विद्यार्थ्यांसाठी असलेल्या स्वच्छतागृहाची अत्यंत दयनीय अवस्था झाल्याने विद्यार्थ्यांच्या आरोग्य, सुरक्षितता व सन्मानाचा गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे. या पार्श्वभूमीवर सामाजिक कार्यकर्ते व पालक विलास चरपे यांनी नगर परिषदेचे मुख्याधिकारी यांना निवेदन देत तातडीने स्वच्छता, दुरुस्ती आणि आवश्यक सुविधा उपलब्ध करून देण्याची मागणी केली आहे.

निवेदनात नमूद करण्यात आले आहे की, शाळेतील स्वच्छतागृहाची नियमित स्वच्छता होत नसल्याने मोठ्या प्रमाणात दुर्गंधी पसरली असून अनेक ठिकाणी घाण साचलेली आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांच्या आरोग्यावर विपरीत परिणाम होण्याची शक्यता असून पावसाळ्यात संसर्गजन्य आजारांचा धोका अधिक वाढू शकतो. विशेषतः लहान विद्यार्थ्यांना अस्वच्छ वातावरणाचा सर्वाधिक फटका बसत असल्याची खंत पालकांनी व्यक्त केली आहे.

स्वच्छतागृहातील अनेक दरवाजे तुटलेल्या अवस्थेत असल्याने विद्यार्थ्यांना, विशेषतः विद्यार्थिनींना, गोपनीयता व सुरक्षिततेचा गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे. तुटलेले दरवाजे, खराब झालेली कुलूपे आणि निकृष्ट दजार्चे साहित्य यामुळे स्वच्छतागृह वापरताना विद्यार्थ्यांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत असल्याचेही निवेदनात नमूद करण्यात आले आहे.

यासंदर्भात विलास चरपे यांनी पालक या नात्याने शाळेत जाऊन स्वच्छतागृहाचे छायाचित्रण करण्याचा प्रयत्न केला असता काही उपस्थित शिक्षकांनी एफआयआर दाखल करण्याची धमकी देत फोटो काढण्यास मज्जाव केल्याचा आरोप त्यांनी 'लोकमत'शी बोलताना केला. या प्रकारामुळे पालकांमध्येही संतापाची भावना निर्माण झाली असून, शाळेतील समस्या लपविण्यापेक्षा त्या तातडीने सोडविणे गरजेचे असल्याची प्रतिक्रिया व्यक्त होत आहे.

दरम्यान, सोशल मीडियावर या प्रकरणाची माहिती प्रसारित होताच नगराध्यक्ष मनोज कोरडे यांनी मुख्याधिकारी धनंजय बोरीकर यांच्यासह शाळेला भेट देऊन प्रत्यक्ष पाहणी केली. पाहणीदरम्यान अवघ्या तीन महिन्यांपूर्वी बसविण्यात आलेले स्वच्छतागृहाचे दरवाजे निकृष्ट दर्जामुळे तुटलेल्या अवस्थेत आढळले. तसेच अनेक वर्गखोल्यांमध्ये कचऱ्याचे ढीग, शाळेच्या मागील परिसरात वाढलेली झुडपे आणि अस्वच्छता निदर्शनास आली.



नगराध्यक्ष मनोज कोरडे यांनी तात्काळ सफाई विभागाला संपूर्ण शाळा परिसर, वर्गखोल्या व स्वच्छतागृह स्वच्छ करण्याचे निर्देश दिले. तसेच निकृष्ट दजार्ची कामे करणाऱ्या संबंधित ठेकेदारांची चौकशी करून आवश्यक ती कारवाई करण्याचे संकेत दिले.

पालकांनी शाळेतील स्वच्छतागृहाची नियमित स्वच्छता, निर्जंतुकीकरण, तुटलेले दरवाजे व साहित्य तातडीने बदलणे, नियमित देखभालीसाठी स्वतंत्र यंत्रणा उभारणे आणि विद्यार्थ्यांना सुरक्षित व स्वच्छ सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी आवश्यक निधी मंजूर करण्याची मागणी केली आहे. या निवेदनाची प्रत शिक्षण उपसंचालक, नागपूर विभाग यांनाही पाठविण्यात आली आहे. विद्यार्थ्यांचे आरोग्य, सुरक्षितता आणि गुणवत्तापूर्ण शैक्षणिक वातावरण अबाधित ठेवण्यासाठी नगर परिषद प्रशासनाने तातडीने ठोस निर्णय घेऊन कायमस्वरूपी उपाययोजना कराव्यात, अशी मागणी पालक व नागरिकांकडून होत आहे.

# आमदार किशोर जोरगेवार यांच्या मध्यस्थीने कंत्राटी सफाई कामगारांचा वेतनाचा प्रश्न मार्गी

**थकीत वेतन सोमवारी देणार, बोनसही मंजूर**

**दै. सिंहवाणी वृत्त, चंद्रपूर**

थकीत वेतन अदा करावे तसेच इतर प्रलंबित मागण्या तातडीने पूर्ण कराव्यात, या मागण्यांसाठी चंद्रपूर महानगरपालिकेसमोर कंत्राटी सफाई कामगारांनी कष्टकरी जनसंघ यांच्या नेतृत्वात मागील ७ तारखेपासून आंदोलन सुरू केले होते. या आंदोलनाची गंभीर दखल घेत आमदार किशोर जोरगेवार यांनी आज शुक्रवारी आंदोलनस्थळी भेट देत कामगारांशी संवाद साधला. त्यानंतर त्यांनी मनपा आयुक्त अनुकुरी नरेश यांच्याशी दूरध्वनीवरून संपर्क साधून कामगारांचे थकीत वेतन तात्काळ अदा करण्याच्या सूचना दिल्या. आमदारांच्या हस्तक्षेपानंतर आंदोलनाला मोठे यश मिळाले असून, सोमवारी थकीत वेतन अदा करण्यात येणार असल्याचे मनपा प्रशासनाने मान्य केले आहे.

आंदोलनादरम्यान कामगारांनी अनेक दिवसांपासून वेतन न मिळाल्यामुळे उद्भवलेल्या आर्थिक अडचणी आमदार किशोर जोरगेवार यांच्यासमोर मांडल्या. कुटुंबाचा उदरनिर्वाह, 




मुलांचे शिक्षण आणि दैनंदिन खर्च भागविणे कठीण झाले असल्याची व्यथा त्यांनी व्यक्त केली. यावर आमदार जोरगेवार यांनी तातडीने मनपा आयुक्त अनुकुरी नरेश यांच्याशी संपर्क साधत या प्रश्नाकडे गांभीयार्ने लक्ष देण्याची मागणी केली. आयुक्तांनी तात्काळ संबंधित वेतनाची फाईल मागवून घेत सोमवारी कामगारांचे थकीत वेतन अदा करण्यात येईल, असे आश्वासन दिले. तसेच कंत्राटी सफाई कामगारांना बोनस देण्यासही यावेळी मान्यता देण्यात आली.

यावेळी आमदार किशोर जोरगेवार यांनी सफाई कामगार हे शहराच्या स्वच्छतेचे खरे शिल्पकार असून, त्यांना वेळेवर वेतन आणि त्यांच्या न्याय्य हक्कांपासून वंचित ठेवणे योग्य नसल्याचे स्पष्ट केले. कामगारांच्या अडचणी सोडविण्यासाठी आपण सदैव कटिबद्ध असून, त्यांच्या प्रश्नांवर सकारात्मक मार्ग काढण्यासाठी सातत्याने प्रयत्न करत राहू, अशी ग्वाही त्यांनी कामगारांना दिली.

आमदार किशोर जोरगेवार यांच्या हस्तक्षेपामुळे थकीत वेतनाचा प्रश्न मार्गी लागल्याने आंदोलनकर्त्या कामगारांनी समाधान व्यक्त केले. वेतन आणि बोनसबाबत सकारात्मक निर्णय झाल्यामुळे कामगारांमध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे.

**कामगारांना पूर्ववत सेवेत घेण्याबाबत लवकरच बैठक**

कंत्राटी सफाई कामगारांना पूर्ववत कामावर घेण्याच्या मागणीचीही आमदार किशोर जोरगेवार यांनी दखल घेतली. यासंदर्भात मनपा आयुक्त अनुकुरी नरेश यांच्याशी दूरध्वनीवरून चर्चा करत कामगारांच्या पुनर्नियुक्तीबाबत लवकरात लवकर बैठक आयोजित करण्याच्या सूचना त्यांनी दिल्या. त्यानुसार संबंधित अधिकाऱ्यांसोबत लवकरच बैठक घेऊन या प्रश्नावर सकारात्मक निर्णय घेण्यासाठी आवश्यक कार्यवाही करण्यात येणार असल्याचे यावेळी सांगण्यात आले.

# दहा दिवसानंतर पुन्हा ग्रा पं अरोली सरपंच पदावर माजी सरपंचा रोशनी प्रशांत भुरे रुजू

**ग्रामविकास मंत्री जयकुमार गोरे यांनी अप्पर आयुक्त यांच्या अपात्रतेच्या आदेशाला दिली स्थगिती**

**दै. सिंहवाणी वृत्त, कोदामेंढी**

७ जुलैला अरोली ग्रामपंचायत सदस्य अमोल कुबडे यांच्या तक्रारीवरून महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम १९५८ चे कलम ३९ (१ ) अंतर्गत अप्पर आयुक्त नागपूर विभाग यांनी सरपंचा रोशनी प्रशांत भुरे यांना अपात्र घोषित केले होते. सदर आदेशाच्या विरुद्ध रोशनी प्रशांत भुरे यांनी ग्रामविकास व पंचायतराज मंत्री जयकुमार गोरे,मंत्रालय, मुंबई यांच्या



न्यायालयात महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम १९५८ चे कलम ३९ (३) अन्वये अपील दाखल केले होते.

सदर प्रकरणावर आज शुक्रवार (ता.१७ जुलै) रोजी झालेल्या सुनावणीत मंत्री गोरे यांनी अपिलार्थी रोशनी प्रशांत भुरे यांची स्थगिती मिळण्याबाबतची विनंती मान्य करून अप्पर आयुक्त नागपूर विभाग यांच्या दिनांक ७ जुलैच्या मूळ आदेश पुढील सुनावणी पर्यंत तात्पुरती स्थगिती प्रदान केली आहे. त्यामुळे दहा दिवसाच्या प्रतीक्षेनंतर माजी सरपंचा रोशनी प्रशांत भुरे, ग्रामपंचायत अरोली सरपंच पदावर पुन्हा दुसऱ्यांदा रुजू झालेल्या आहेत. तसा लेखी आदेशही गट विकास अधिकारी पंचायत समिती मौदा यांनी भुरे यांना पाठविलेला आहे. तो आदेश सरपंच रोशनी प्रशांत भुरे यांचे पती तालुका शिवसेनाप्रमुख (रामटेक विधानसभा क्षेत्र) प्रशांत भुरे यांनी सोशल मीडियावर वायरल करताच भुरे यांच्या समर्थकांतर्फे सरपंच रोशनी भुरे यांच्यावर शुभेच्छांच्या वर्षाव होत आहे, तर भूरे यांच्या विरोधकांमध्ये स्मशान शांतता पसरलेली आहे.

## केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांचा जनसंपर्क कार्यक्रम १९ जुलैला

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

केंद्रीय रस्ते वाहतूक व महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांचा जनसंपर्क कार्यक्रम रविवार, दि. १९ जुलै २०२६ रोजी महाल येथील गडकरी वाडा येथे आयोजित करण्यात आला आहे.



महालातील गडकरी वाडा येथे मा. मंत्री महोदय यांच्या जनसंपर्क कार्यालयात सकाळी ११ ते दुपारी १ या वेळेत हा कार्यक्रम होईल. या वेळेत मंत्री महोदय नागरिकांची निवेदने स्वीकारतील. मा. मंत्री महोदय नागरिकांना व्यक्तिशः भेटतील आणि त्यांच्याशी संवाद साधतील. नागरिकांनी आपल्या समस्या, अडचणी, मागण्या लेखी स्वरुपातच (आवश्यक कागदपत्रे जोडून) आणाव्यात. तसेच आपली लेखी निवेदने मा. मंत्री महोदयांना द्यावीत, असे आवाहन करण्यात आले आहे. त्यानंतर दुपारी १ ते २ या कालावधीत नितीन गडकरी आपल्या जनसंपर्क कार्यालयात भाजपचे पदाधिकारी व कार्यकर्त्यांना भेटतील.

# १६ मार्च १९९८ च्या शासन निर्णयाची अंमलबजावणी करा, वस्तीगृह कर्मचाऱ्यांना ५० टक्के मानधन द्या : राहुल झोडापे

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

महाराष्ट्र राज्य अनुदानित वस्तीगृह कर्मचारी संघटनेचे उपाध्यक्ष राहुल झोडापे यांनी आज आयोजित पत्रपरिषदेत १६ मार्च १९९८ च्या शासन निर्णयाची तात्काळ अंमलबजावणी करून अनुदानित वस्तीगृहातील कर्मचाऱ्यांना संस्थाचालकांकडून देय असलेले ५० टक्के मानधन त्वरित अदा करावे, अशी ठाम मागणी केली. पत्रकार परिषदेत बोलतांना झोडापे यांनी सांगितले की, शासनाच्या १६ मार्च १९९८ रोजीच्या निर्णयानुसार अनुदानित वस्तीगृहातील अधीक्षकांना ५० टक्के शासनाकडून आणि ५० टक्के संस्थाचालकांकडून



मानधन देण्याची स्पष्ट तरतूद आहे. या निर्णयानुसार १९९८ ते २००४ या कालावधीत अनेक संस्थांनी कर्मचाऱ्यांना ५० टक्के मानधन दिले असून त्याची नोंद वस्तीगृहांच्या लेखापरीक्षण (ऑडिट) अहवालातही आहे. मात्र, २००५ पासून अनेक संस्थाचालकांनी कर्मचाऱ्यांना देण्यात येणारे ५० टक्के थकित मानधन बंद केले,असा आरोप त्यांनी केला. या संदर्भात संघटनेने सामाजिक न्याय विभाग, समाजकल्याण आयुक्त कार्यालय, सर्व जिल्हा समाजकल्याण अधिकारी तसेच जिल्हा परिषदांकडे वारंवार निवेदने व पत्रव्यवहार करूनही संबंधित संस्थाचालकांवर कोणतीही प्रभावी कारवाई करण्यात आलेली नाही, अशी खंत त्यांनी व्यक्त केली.

झोडापे यांनी सांगितले की, सध्या वस्तीगृह अधीक्षकांना शासनाकडून केवळ १० हजार रुपये मानधन दिले जाते. शासन निर्णयानुसार संस्थाचालकांनी देखील तितकेच ५० टक्के थकीत मानधन देणे बंधनकारक आहे. समाजकल्याण आयुक्तांनी २९ मे २०२५ रोजी सर्व जिल्हा समाजकल्याण विभागांना पत्र पाठवून संस्थाचालकांनी कर्मचाऱ्यांच्या बँक खात्यात ५० टक्के थकीत मानधन जमा करावे, अन्यथा त्यांच्यावर कारवाई करावी, असे निर्देश दिले आहेत. मात्र, प्रत्यक्षात या आदेशाची अंमलबजावणी होत नसल्याचा आरोप त्यांनी केला. यावेळी त्यांनी काही गंभीर मुद्द्यांकडेही लक्ष वेधले.

काही संस्थाचालक विद्यार्थ्यांच्या परिपोषण अनुदानाचा योग्य वापर करत नसल्याचा, शासनाच्या नियमांकडे दुर्लक्ष करून इमारत भाड्याच्या नावाखाली मोठ्या प्रमाणात आर्थिक लाभ घेत असल्याचा तसेच काही ठिकाणी बोगस वस्तीगृहे चालवून शासनाची फसवणूक होत असल्याचा आरोप त्यांनी केला. नागपूर जिल्ह्यात अशा प्रकारच्या वस्तीगृहांची चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करण्याची मागणीही त्यांनी केली. वस्तीगृह कर्मचाऱ्यांच्या सेवासुरक्षेचाही प्रश्न गंभीर असून अनेक कर्मचाऱ्यांना विमा, भविष्य निर्वाह निधी (पीएफ) यांसारख्या मूलभूत सुविधा मिळत नसल्याचे त्यांनी सांगितले. शासनाने या कर्मचाऱ्यांच्या हितासाठी विशेष धोरण राबवून त्यांना सामाजिक सुरक्षा द्यावी, अशी मागणी त्यांनी केली. शेवटी, १६ मार्च १९९८ च्या शासन निर्णयातील तरतुदीनुसार संस्था चालकांकडून थकीत देय असलेले ५० टक्के मानधन तातडीने कर्मचाऱ्यांना मिळावे, नियमांचे उल्लंघन करणाऱ्या संस्थाचालकांवर कठोर कारवाई करण्यात यावी आणि वस्तीगृह कर्मचाऱ्यांना न्याय द्यावा, अशी मागणी राहुल झोडापे यांनी पत्रकार परिषदेतून शासनाकडे केली.

थोडक्यात

## तीनचाकी सायकलला धडक, अपंग चालकाचा मृत्यू

### दुचाकीचालकाविरुद्ध गुन्हा दाखल, गोडबोरी फाटा येथील अपघात





**दै. सिंहवाणी वृत्त, भिवापूर**

गोडबोरी फाटा बसथांब्यासमोर भरधाव दुचाकीच्या धडकेत गंभीर जखमी झालेल्या अपंग व्यक्तीचा नागपूर येथील रुग्णालयात उपचारादरम्यान मृत्यू झाला. या घटनेनंतर भिवापूर पोलिसांनी दुचाकीचालकाविरुद्ध दाखल गुन्ह्यात मृत्यूस कारणीभूत ठरल्याचे संबंधित कलम वाढवून पुढील कारवाई सुरू केली आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, १६ जुलै रोजी सकाळी गोंडबोरी फाटा येथे रानमांगली येथील गोर्वधन डोमाजी लोहारे (वय ४५) हे त्यांच्या तीन चाकी सायकल वर रस्त्याच्या कडेला उभे असताना उमरेडकडून भरधाव वेगाने आलेल्या एमएच-४०-एजे-०१८० क्रमांकाच्या दुचाकीने त्यांच्या वाहनाला मागून जोरदार धडक दिली. धडकेमुळे लोहारे गंभीर जखमी झाले. त्यांना प्रथम ग्रामीण रुग्णालय, भिवापूर येथे दाखल करण्यात आले. त्यानंतर प्रकृती चिंताजनक असल्याने नागपूर येथील शासकीय रुग्णालयात हलविण्यात आले.

मात्र, उपचार सुरू असतानाच त्यांचा मृत्यू झाला. या घटनेनंतर पोलिसांनी आरोपी दुचाकीचालक प्रशांत कैलास सोनकुसरे (वय २५, रा. पवनी, जि. भंडारा) याच्याविरुद्ध यापूर्वी दाखल करण्यात आलेल्या कलम २८१, १२५(अ) बीएनएस व मोटार वाहन कायदा कलम १८४ या गुन्ह्यात मृत्यूस कारणीभूत ठरल्याबाबतचे संबंधित कलम वाढवून गुन्ह्याचा तपास सुरू केला आहे. अपघातानंतर प्रत्यक्षदर्शींच्या जबाब, घटनास्थळ पंचनामा आणि इतर पुराव्यांच्या आधारे पुढील तपास पोलीस करीत आहेत.

## माजी आमदार राजू पारवे यांनी उमरेड एमआयडीसीतील कंत्राटी कामगारांच्या समस्यांची घेतली दखल



**दै. सिंहवाणी वृत्त, उमरेड**

उमरेड एमआयडीसी येथील टाटा प्रोजेक्ट्स कंपनी लिमिटेडमध्ये कंत्राटी पद्धतीने कार्यरत असलेल्या काही कामगारांनी त्यांच्या विविध समस्यांसंदर्भात माजी आमदार राजूभाऊ पारवे यांची भेट घेऊन निवेदन सादर केले. यावेळी कामगारांनी पीएफ कपात होत नसणे, पीएफ खात्याशी संबंधित तांत्रिक व प्रशासकीय अडचणी, वेतन वेळेवर न मिळणे तसेच पगारातील तफावत याबाबत सविस्तर माहिती दिली. कामगारांच्या समस्या गांभीर्याने ऐकून घेतल्यानंतर राजूभाऊ पारवे यांनी तत्काळ टाटा प्रोजेक्ट्स कंपनीला प्रत्यक्ष भेट देऊन व्यवस्थापनाशी चर्चा केली. चर्चेदरम्यान कामगारांच्या विविध अडचणी व्यवस्थापनाच्या निदर्शनास आणून देत त्यावर तातडीने सकारात्मक तोडगा काढण्याची मागणी करण्यात आली. तसेच पीएफसह वेतनाशी संबंधित सर्व प्रलंबित प्रश्न लवकरात लवकर निकाली काढण्याबाबतही चर्चा झाली.

यावेळी कामगारांच्या न्याय्य मागण्यांवर योग्य कार्यवाही करून त्यांच्या समस्या तातडीने सोडविण्याचे आश्वासन व्यवस्थापनाकडून देण्यात आले. याप्रसंगी राजूभाऊ पारवे यांनी, "सर्वसामान्य नागरिक असो किंवा कामगार, प्रत्येकाच्या न्याय्य हक्कांचे संरक्षण व्हावे आणि त्यांच्या समस्या वेळेत मार्गी लागाव्यात, यासाठी आपण कायम प्रयत्नशील राहणार आहोत," असे सांगितले.

## 'एसआयआर' अंतर्गत घरभेटीत न भेटलेल्या मतदारांसाठी विशेष शिबिरांचे आयोजन

### ५३ दक्षिण नागपूर विधानसभा मतदारसंघातील मतदारांना संधी

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

विशेष सखोल पुनरीक्षण (एसआयआर) कार्यक्रमांतर्गत मतदान केंद्रस्तरीय अधिकाऱ्यांच्या (बीएलओ) यांच्या घरभेटीत घरी उपलब्ध न होणाऱ्या, बाहेरगावी असणाऱ्या किंवा अन्य कारणांपायी प्रत्यक्ष मतदार पडताळणी होऊ न शकलेल्या मतदारांच्या सोयीसाठी ५३ दक्षिण नागपूर विधानसभा मतदारसंघात विशेष शिबीरांचे आयोजन करण्यात आले आहे. ही विशेष शिबीरे संबंधित मतदान केंद्रांवरच दि. १८ (शनिवार), १९ (रविवार), २५ (शनिवार) व २६ (रविवार) जुलै २०२६ रोजी आयोजित होणार असून त्यात पडताळणीची प्रक्रिया पार पाडली जाणार आहे. भारत निवडणूक आयोगाच्या आदेशानुसार तसेच जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी, नागपूर यांच्या निर्देशानुसार विशेष सखोल पुनरीक्षण (एसआयआर) कार्यक्रमांतर्गत मतदान केंद्रस्तरीय अधिकारी (बीएलओ) यांच्यामार्फत घरभेटी देऊन मतदार पडताळणी व प्रपत्र वितरणाचे काम सुरू आहे. काही मतदार घरभेटीदरम्यान उपलब्ध होत नसल्याचे आढळून आले आहे. त्यामुळे त्यांची पडताळणी अद्याप होऊ शकलेली नाही. अशा मतदारांची पडताळणी पूर्ण करण्यासाठी या विशेष शिबिरांचे आयोजन करण्यात आले आहे. संबंधित मतदान केंद्रांवर आयोजित या विशेष शिबिरांमध्ये मतदान केंद्रस्तरीय अधिकारी (बीएलओ) उपस्थित राहून मतदार पडताळणी, आवश्यक प्रपत्रांचा स्वीकार तसेच त्यासंदर्भातील कार्यवाही करणार आहेत. ५३ दक्षिण नागपूर विधानसभा मतदारसंघातील संबंधित मतदारांनी निर्धारित दिनांक, वेळ व ठिकाणी आवश्यक कागदपत्रांसह उपस्थित राहून आपली पडताळणी पूर्ण करून घ्यावी व या सुविधेचा लाभ घ्यावा, असे आवाहन मतदार नोंदणी अधिकारी, ५३ दक्षिण नागपूर विधानसभा मतदारसंघ यांनी केले आहे.

# वातावरण बदलातील आव्हानांना स्वीकारुन कृषी क्षेत्रातील प्रगतीसाठी शासन कटिबध्द

### जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद, शेतकऱ्यांच्या अनुभवांना उच्च तंत्रज्ञानाची जोड देण्यासाठी हॉटेल सेंटर पॉईंट येथे विशेष परिसंवाद संपन्न

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**






कृषी क्षेत्रात अधिकाधिक आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर आणि शेतकरी ते थेट ग्राहक अशी उत्पादन व विक्री श्रृंखला जोपर्यंत सक्षम होणार नाही तोपर्यंत शेतकऱ्यांच्या आर्थिक लाभात अधिक वृध्दी दूरापास्त आहे. वातावरणातील अनेक बदलांची आव्हाने स्वीकारत अधिक परिपक्व झालेल्या शेतकरी बांधवांच्या अनुभवांची जोड नवीन उच्च कृषी तंत्रज्ञानाला मिळाल्यास नागपूर जिल्ह्यातील शेतकरी फायदेशीर शेतीचा नवा मार्ग विकसीत करतील असा विश्वास जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी व्यक्त केला.

शेतकऱ्यांच्या अनुभवातील व ज्यांनी विविध प्रगतशील प्रयोग आपल्या शेतीत केले अशा शेतकऱ्यांच्या अनुभवांचे आदानप्रदान व्हावे व शासनस्तरावर जिल्ह्याच्या कृषी क्षेत्राला व्यापक विकास नियोजनाची जोड देता यावी याउद्देशाने येथील हॉटेल सेंटर पॉईंट येथे आयोजित परिसंवादात ते बोलत होते. यावेळी आत्माच्या प्रकल्प संचालिका डॉ. अर्चना कडू, जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी रविंद्र मनोहरे, उपसंचालक पल्लवी तलमले व वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते. या कार्यक्रमास संपूर्ण जिल्ह्यातून आमंत्रित करण्यात आलेले जिल्ह्यातील १३० हुन अधिक प्रगतिशील शेतकरी, महिला शेतकरी आणि शेतकरी उत्पादक कंपन्यांचे संचालक सहभागी झाले होते.

नागपूर जिल्ह्यात धान, सोयाबीन, तूर, कापूस, संत्रा व इतर फळपिके प्रामुख्याने होतात. यात आंतरपिकासह पीक पध्दतीमध्ये बदलाची शक्यता व संधी, वातावरण बदलामुळे किड रोगाचे व्यवस्थापन, विविध अडचणी, आधुनिक उत्पादन तंत्रज्ञान व नियोजन, शेतकरी उत्पादक कंपन्या, सेंद्रीय शेती, महिला बचत गटांच्या माध्यमातून विविध कृषी उत्पादनांचा कृषी व्यवसाय व मनुष्यबळ उपलब्धी याबाबत शेतकऱ्यांना वेळोवेळी विविध अडचणींना सामोरे जावे लागते. यातून मार्ग काढण्यासाठी शासनाच्या विविध योजना व पात्र लाभार्थ्यांची निवड आणि व्यवस्थापन यांचा सुवर्णमध्ये साध्य करण्यासाठी शासन प्रयत्नशील असल्याचे जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी सांगितले. प्रायोगिक तत्वावर व नाविन्यपूर्ण काही कल्पना असल्यास त्या जिल्हा वार्षिक नियोजन आराखड्यातून करण्याबाबत प्रयत्न करु, असे ते म्हणाले.

या परिसंवादात वन क्षेत्राच्या जवळ असलेल्या शेतीतील पिकाच्या संरक्षणासाठी लेझर टेक्नॉलाजी व स्मार्ट तंत्रज्ञान, फळबागेसाठी छाटणी करीता नवीन सुलभ प्रुनिंग मशिन, संत्र्याचे ग्रीडींग व पॅकेजिंग सेंटर, लिफ टेस्टींग लॅब, बुम स्प्रेअर, ठिबक सिंचन प्रणालीसाठी अटोमायझेशन याला अधिकाधिक अनुदान उपलब्ध करुन देण्याबाबतही या परिसंवादात चर्चा झाली. याचबरोबर बॅटरीवर चालणारे पॉवर टिलर, सोलर ड्रायर, चियासीड व मोहरी यांसारख्या पिकांसाठी आधुनिक तंत्रज्ञानाचे हार्वेस्टर, भात पिकाकरीता डिएसआर यंत्र, भात लावणी यंत्र उपलब्ध करून देणे, सोयाबीन पिकाकरीता बीबीएफ आणि बीज प्रक्रिया यंत्र, कापूस पिकाकरीता कॉटन ग्रेडर आदी तंत्रज्ञान शेतकऱ्यांना उपलब्ध करुन देण्याबाबत चर्चा करण्यात आली.

# चंद्रपूरच्या पीक विमा हप्ता दरांबाबत आ. सुधीर मुनगंटीवार यांच्या मागणीची गंभीर दखल

### मुख्यमंत्र्यांनी कृषी सचिवांना दिले अहवालाचे निर्देश, २८ जुलै रोजी कृषिमंत्री दत्तात्रय भरणे यांच्या उपस्थितीत मुंबईत महत्त्वपूर्ण बैठक, चंद्रपूरच्या शेतकऱ्यांना न्याय मिळण्याची अपेक्षा





**दै. सिंहवाणी वृत्त, चंद्रपूर**

चंद्रपूर जिल्ह्यातील शेतकऱ्यांवर अन्यायकारक ठरत असलेल्या पीक विमा हप्ता दरांचा प्रश्न अत्यंत संवेदनशीलतेने मांडत राज्याचे माजी वने, सांस्कृतिक कार्य व मत्स्यव्यवसाय मंत्री आ. सुधीर मुनगंटीवार यांनी केलेल्या सातत्यपूर्ण पाठपुराव्याची राज्य शासनाने गंभीर दखल घेतली आहे. मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस यांनी या विषयाचे गांभीर्य ओळखून कृषी सचिवांना संपूर्ण प्रकरणाचा सविस्तर अहवाल सादर करण्याचे निर्देश दिले आहेत.

तसेच, या विषयावर २८ जुलै २०२६ रोजी मुंबई येथे कृषिमंत्री दत्तात्रयजी भरणे यांच्या उपस्थितीत महत्त्वपूर्ण बैठक होणार असून, चंद्रपूर जिल्ह्यातील शेतकऱ्यांना न्याय मिळेल, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे. जिल्ह्यातील शेतकऱ्यांच्या हिताला सर्वोच्च प्राधान्य देत त्यांच्यावर अन्याय होऊ नये, यासाठी आ. सुधीर मुनगंटीवार यांनी घेतलेली भूमिका त्यांच्या शेतकरीप्रती असलेल्या संवेदनशीलतेची आणि बांधिलकीची पुन्हा एकदा प्रचिती देणारी ठरली आहे.

खरीप हंगाम २०२६ मध्ये चंद्रपूर जिल्ह्यातील भात, सोयाबीन आणि कापूस उत्पादक शेतकऱ्यांसाठी निश्चित करण्यात आलेले पीक विमा दर शेजारील गडचिरोली, गोंदिया, भंडारा, नागपूर आणि वर्धा जिल्ह्यांच्या तुलनेत अनेक पटींनी अधिक असल्याची बाब आ. मुनगंटीवार यांनी मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस आणि कृषिमंत्री दत्तात्रय भरणे यांच्या निदर्शनास आणून दिली होती. समान भौगोलिक परिस्थिती, हवामान, पर्जन्यमान आणि पीकपद्धती असतानाही चंद्रपूर जिल्ह्यावर वाढीव आर्थिक भार टाकणे अन्यायकारक असल्याचे आ. मुनगंटीवार यांनी ठामपणे मांडले होते.

आ. मुनगंटीवार यांनी शासनाकडे चंद्रपूर जिल्ह्यासाठी निश्चित करण्यात आलेल्या पीक विमा हप्त्याचा तातडीने फेरविचार करून, त्यातील विसंगती दूर करत शेजारील जिल्ह्यांप्रमाणे वाजवी दर लागू करण्याची मागणी केली होती. तसेच, सुधारित दर निश्चित होईपर्यंत पीक विमा भरण्याची अंतिम मुदत वाढवावी, जेणेकरून कोणताही शेतकरी पीक विमा योजनेपासून वंचित राहणार नाही, अशीही मागणी त्यांनी केली होती.

मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस यांनी या विषयाची गंभीर दखल घेत कृषी सचिवांना तातडीने अहवाल सादर करण्याचे निर्देश दिल्याने चंद्रपूर जिल्ह्यातील शेतकऱ्यांच्या अपेक्षा उंचावल्या आहेत. कृषिमंत्री दत्तात्रय भरणे यांच्या प्रमुख उपस्थितीत २८ जुलै रोजी मुंबई येथे होणाऱ्या बैठकीत चंद्रपूर जिल्ह्याच्या पीक विमा दरातील विसंगती दूर करून शेतकऱ्यांना न्याय देणारा निर्णय होईल, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

## खोदकाम करण्यापूर्वी मनपाची परवानगी आवश्यकः आयुक्त डॉ. विपीन




**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

नागपूर शहरात मोठ्या प्रमाणात विकास कामे सुरू असून, विविध एजेन्सीच्या मार्फत ही कामे केली जातात आहेत. विकास कामे करतांना रस्ते खोदण्यात येतात. या विकासकामांमध्ये समन्वय साधण्यासाठी नागपूर महानगरपालिका आयुक्त डॉ. विपीन यांच्या पुढाकाराने सर्व संबंधित विभागाची एक बैठक शुक्रवारी (ता. १७) मनपा आयुक्त यांचा सभा कक्षात पार पडली. बैठकीत मनपा आयुक्त डॉ. विपीन यांनी सर्व विकास करणाऱ्या एजेन्सी यांना खोदकाम करतांना मनपाची मंजुरी घ्यावी लागेल. तसेच यासाठी एक पोर्टल तयार करण्यात येईल. त्यांनी समन्वयाने विकास कामे करण्याचे निर्देश दिले.

बैठकीत महावितरणचे मुख्य अभियंता, महाजेनकोचे मुख्य अभियंता, मनपाच्या अधीक्षक अभियंता डॉ.श्वेता बॅनर्जी, मनोज तालेवार, मनपा नगर रचना विभागाचे ऋतुराज जाधव, कार्यकारी अभियंता राजेश दुपारे, नागपूर सुधार प्रन्यास, राष्ट्रीय महामार्ग, बीएसएनएलसह इतर विभागाचे प्रतिनिधी उपस्थित होते.

नागपूर महानगरपालिकातर्फे नाग नदी पुनर्जीवन प्रकल्प, अमृत योजना आणि इतर ठिकाणी कामे सुरू आहे. तसेच विविध शासकीय विभाग सुद्धा नागपुरात कामे करीत आहे. बरेच ठिकाणी असे आढळले आहे की, विकास कामे करतांना रस्त्याच्या खाली युटिलिटी (आवश्यक सेवा) जसे पाईप लाईन, विद्युत केबल, टेलेफोन केबल, आणि इतर बाबी असतात.

खोदकामामुळे या सुविधा विस्कळीत होतात आणि त्याचा परिणाम नागरिकांवर होतो. मनपा आयुक्तांनी सर्व विभागांना त्यांच्यामार्फत टाकण्यात आलेल्या केबल लाईनच्या जीपीएस मॅप देण्याचे निर्देश दिले. तसेच कोणतेही खोदकाम करण्यापूर्वी मनपाकडून परवानगी घेण्याचे ही आदेश दिले. त्यांनी सांगितले की, ज्या विभागांनी पूर्व परवानगी घेतली नाही तर त्यांच्या विरोधात कडक कारवाई करण्यात येईल.

# पाऊले चालती पंढरीची वाट, उमरेडच्या वारीचे पंढरीच्या दिशेने प्रस्थान!

### वरुणराजाने केले वारीचे स्वागत; माऊलींच्या पादुकांवर बरसल्या पावसाच्या सरी!



**दै. सिंहवाणी वृत्त, उमरेड**

"अवघाची संसार सुखाचा करीन, आनंदे भरीन तिन्ही लोक..." हा संत ज्ञानेश्वर माऊलींचा विश्वकल्याणाचा संदेश अंतःकरणात साठवत उमरेड नगरीतून आज संत ज्ञानेश्वर महाराजांच्या पादुकांसह वारकरी संप्रदायाची दिंडी पंढरपूरच्या दिशेने भक्तिभावाने प्रस्थान पावली. येत्या २५ जुलै रोजी होणाऱ्या देवशयनी आषाढी एकादशी निमित्त लाखो वारकरी ज्या दिव्य सोहळ्याची आतुरतेने वाट पाहतात, त्या शतकानुशतके सुरू असलेल्या पंढरीच्या पायी वारीचा भाग बनण्यासाठी उमरेडची दिंडी उत्साहात मार्गस्थ झाली.

गेल्या अनेक दिवसांपासून पावसाने दडी मारल्याने शेतकरी चिंतेत होते. मात्र दिंडी प्रस्थान करताच वरुणराजानेही जणू माऊलींच्या चरणी वंदन करत सरी बरसवल्या. भक्ती आणि निसर्गाचा हा सुंदर संगम अनुभवताना वारकरी, नागरिक आणि शेतकरी यांच्या आनंदाला अक्षरशः उधाण आले.

ह.भ.प. प्रदीप इंगळे महाराज यांच्या मार्गदर्शनाखाली "जय जय राम कृष्ण हरी", "ज्ञानोबा-तुकाराम"च्या अखंड गजरात दिंडी पुढे सरकत होती. माता-भगिनी डोक्यावर तुळशीवृंदावन घेऊन, तर लहान मुले भगवी पताका हातात घेऊन उत्साहाने सहभागी झाली होती. दिंडीसोबत चालणारा माऊलीचा शुभ्र धवल अश्वही उपस्थितांचे विशेष आकर्षण ठरला.

संताजी जगनाडे चौकात दिंडी पोहोचताच वारकऱ्यांनी पारंपरिक गोल रिंगण साकारत विठ्ठल नामाचा गजर केला. हरिनामाच्या अखंड घोषात आणि टाळ-मृदंगाच्या निनादात वातावरण भक्तिमय झाले. पावसाच्या आगमनाबद्दल पांडुरंगाचे कृतज्ञतापूर्वक स्मरण करत दिंडीने इतवारी मुख्य बाजारपेठ मार्गे नगरपालिका कार्यालयाच्या दिशेने शिस्तबद्ध प्रस्थान केले.

महादेव मंदिराजवळ दिंडीचे उमरेड नगर परिषदेच्या नगराध्यक्षा सौ. प्राजक्ता रोहित कारु यांनी स्वागत केले. शाल-श्रीफळ देऊन वारकऱ्यांचा सन्मान करण्यात आला. तसेच पंढरीच्या विठोबासाठी सोवळे आणि माता रखुमाईसाठी साडी अर्पण करून दिंडीला मंगलमय शुभेच्छांसह निरोप देण्यात आला.

देवशयनी आषाढी एकादशी ही वारकरी संप्रदायासाठी केवळ धार्मिक परंपरा नसून श्रद्धा, समता, सेवा आणि मानवतेचा महाउत्सव मानली जाते. संत ज्ञानेश्वर, संत तुकाराम, संत नामदेव यांसह संत परंपरेने दिलेला भक्ती, समता आणि समाजप्रबोधनाचा संदेश आजही ही वारी जिवंत ठेवत आहे.

आज बरसलेल्या पावसामुळे कोमेजलेल्या पिकांना नवसंजीवनी मिळण्याची आशा निर्माण झाली असून शेतकऱ्यांच्या चेहऱ्यावर समाधान झळकले. उमरेडकरांनीही या पावसाचे आणि माऊलींच्या कृपेचे आनंदाने स्वागत केले.

"वृक्षवल्ली आम्हा सोयरे वनचरे," असे संत तुकाराम महाराजांनी सांगितल्याप्रमाणे निसर्गाशी एकरूप होण्याचा संदेश देणारी ही वारी यंदा भक्तीबरोबरच निसर्गकृपेचाही उत्सव ठरली. माऊलीच्या कृपेने बरसलेल्या पावसाच्या सरी, विठ्ठल नामाचा अखंड गजर आणि हजारो वारकऱ्यांचा उत्साह यामुळे उमरेड नगरी आज अक्षरशः भक्तिरसात न्हाऊन निघाली.

# नगरपरिषदेच्या रस्ते व नाली बांधकामावर निकृष्ट दर्जाचे आरोप

### सालेकसा रोडवरील कामांबाबत नागरिकांचा संताप, कोरेबार ते गणेशपूर मार्गावर नियमांचे उल्लंघन झाल्याचा आरोप, तांत्रिक चौकशी करून दोषींवर कारवाईची मागणी



**दै. सिंहवाणी वृत्त, आमगाव**

आमगाव नगरपरिषद अंतर्गत विविध भागांमध्ये करण्यात आलेल्या सिमेंट कॉंक्रीट रस्ते व नाली बांधकामाच्या गुणवत्तेबाबत नागरिकांनी गंभीर आक्षेप नोंदविले आहेत. अनेक ठिकाणी निकृष्ट दर्जाचे साहित्य वापरण्यात आल्याचा आरोप करत या सर्व कामांची स्वतंत्र तांत्रिक चौकशी करण्याची मागणी नागरिकांनी केली आहे.

नागरिकांच्या आरोपानुसार, सालेकसा रोडवरील कोरेबार ते गणेशपूर या मार्गावरील रस्ते बांधकामात गंभीर अनियमितता झाल्या आहेत. या मार्गावर आवश्यक त्या ठिकाणी पूल किंवा पाण्याच्या निचऱ्यासाठी आवश्यक संरचना न उभारता रस्त्याचे काम करण्यात आल्याचा आरोप आहे. तसेच, मंजूर आराखडा व तांत्रिक निकषांनुसार १८ मिमी गिट्टीच्या वापर अपेक्षित असताना, प्रत्यक्षात १४ मिमी गिट्टीचा वापर करण्यात आल्याचा आरोप नागरिकांनी केला आहे.

या कथित प्रकाराकडे नगरपरिषदेतील संबंधित अधिकारी व अभियंत्यांनी दुर्लक्ष केल्याचा आरोपही नागरिकांनी केला असून, कामांची गुणवत्ता तपासण्यासाठी उच्चस्तरीय तांत्रिक समिती नेमून संपूर्ण चौकशी करण्यात यावी, अशी मागणी करण्यात आली आहे.

नागरिकांचे म्हणणे आहे की, सार्वजनिक निधीतून करण्यात येणाऱ्या विकासकामांमध्ये दर्जाशी तडजोड होणे गंभीर बाब असून, दोषी आढळणाऱ्या ठेकेदार, अभियंते आणि संबंधित अधिकाऱ्यांवर कठोर कारवाई करण्यात यावी. तसेच निकृष्ट दर्जाची कामे संबंधित ठेकेदाराकडून पुन्हा करून घेण्यात यावीत, अशी तिरथ येटरे, अभय ढेगे नितेश दोनोंडे, बालू वंजारी, विनोद तावाडे, पिंकेश शेंडे, जगदीश चुटे प्रशांत गायधने, धीरज ठाकरे, समीर पठाण, राजू लाडसे यांनी मागणी करण्यात आली आहे.

**मुख्याधिकारी प्रमोद कांबळे यांचे स्पष्टीकरण**

आमगाव नगरपरिषदेचे मुख्याधिकारी प्रमोद कांबळे यांनी रस्ते बांधकामातील निकृष्ट दर्जाच्या कामाच्या आरोपांचे खंडन केले आहे. त्यांनी सांगितले की, "मी स्वतः संबंधित कामाची पाहणी करण्यासाठी घटनास्थळी गेलो होतो. पाहणीदरम्यान सदर रस्त्याच्या बांधकामात १८ एमएम गिट्टीचा वापर करण्यात आल्याचे स्पष्टपणे आढळून आले असून, काम तांत्रिक निकषांनुसार योग्य पद्धतीने करण्यात आले आहे. त्यामुळे आमच्यावर करण्यात येत असलेले आरोप पूर्णपणे बिनबुडाचे व तथ्यहीन आहेत."

यासोबतच त्यांनी नागरिकांना अफवांवर विश्वास न ठेवता अधिकृत माहितीवरच विश्वास ठेवण्याचे आवाहन केले आहे.


## बैलबंडी घेऊन शेतकरी पोहचला तहसीलमध्ये शेतकरी नेते किशोर डुकरे यांना पोलिसांनी केले स्थानबद्ध

**दै. सिंहवाणी वृत्त, वरोरा**
**धर्मेंद्र शेरकुरे**

मागील दोन वर्षापासून शेतातील पांदण रस्ता मिळावा याकरिता एक शेतकरी शासकीय कार्यालयाचे उंबरठे झिजवीत होता अखेर खरीप हंगामाला मात्र पांदन रस्ता मिळत नसल्याने हा शेतकरी थेट बैलबंडी घेऊन गुरुवारी उपविभागीय अधिकारी कार्यालय वरोरा च्या परिसरात पोहोचल्याने प्रशासनाची चांगली तारांबळ उडाली वरोरा तालुक्यातील बोरगाव देशपांडे येथील शेतकरी श्रीकृष्ण ऋषी देवतळे यांना शेतात जाण्याकरिता पानंद रस्ता नव्हता त्यांनी महसूल विभागाकडे अर्ज केला.

महसूल विभागाने रस्ता दिला मात्र त्याला इतर शेतकऱ्यांनी आक्षेप घेतला या आक्षेपामुळे सात दिवसापर्यंत काही होणार नाही अशी संबंधिता अधिकाऱ्याने सांगितले दिलेल्या पांदन रस्त्यावरून शेतकरी श्रीकृष्ण देवतळे गेले असता त्यांनाही शेतकऱ्याकडून अडवण्यात आले हंगामात सुद्धा पांदण रस्ता मिळाला नाही त्यामुळे श्रीकृष्ण देवतळे हे बैलबंडी घेऊन उपविभागीय अधिकारी कार्यालयाच्या प्रांगणात पोहोचले आपली बैलबंडी त्यांनी देखील असलेल्या झाडाखाली उभी केली आणि सोबत असलेले बॅनर घेऊन बंडीवर उभे झाले प्रशासनाने याची माहिती लगेच पोलिसांना दिली त्यानंतर पोलिसांनी श्रीकृष्ण देवतळे व प्रहार शेतकरी संघटनेचे जिल्हाध्यक्ष किशोर डुकरे यांना स्थानबद्ध केले.

## महान अष्टपैलू सर गॅरी सोबर्स यांचे निधन




क्रिकेट जगतातून एक अत्यंत दुःखाची आणि मोठी बातमी समोर आली आहे. क्रिकेट इतिहासातील महानतम ऑलराउंडर आणि वेस्टइंडीजचे दिग्गज खेळाडू सर गारफील्ड सोबर्स यांचे वयाच्या ८९ व्या वर्षी निधन झाले आहे. येत्या २८ जुलै रोजी त्यांचा ९० वा वाढदिवस होता, परंतु त्यापूर्वीच त्यांनी या जगाचा निरोप घेतला. त्यांच्या निधनानंतर क्रिकेट वेस्टइंडीजने सोशल मीडियावर पोस्ट शेअर करत सोबर्स यांना भावपूर्ण श्रद्धांजली वाहिली आहे. सर गारफील्ड सोबर्स यांना जगभरात 'सर गॅरी सोबर्स' या नावानेही ओळखले जात असे.

थोडक्यात

## पावसाचे पुनरागमन; नरखेड तालुक्यात शेतकऱ्यांच्या आशा पुन्हा पल्लवित

### रिमझिम सरींनी दिला दिलासा, दुबार पेरणीची भीती काहीअंशी कमी



**दै. सिंहवाणी वृत्त, नरखेड**

नरखेड तालुक्यात शुक्रवारी सकाळपासून आभाळ दाटून आले असून अनेक भागात रिमझिम स्वरूपाचा पाऊस सुरू झाला. पावसाचा जोर अत्यंत कमी असला तरी त्याच्या आगमनाने शेतकरी वर्गाच्या चेहऱ्यावर समाधानाचे हास्य फुलले. गेल्या अनेक दिवसांपासून पावसाने दडी मारल्यामुळे खरीप पिकांचे भवितव्य धोक्यात आले होते. त्यामुळे दुबार पेरणीची वेळ येते की काय, अशी चिंता शेतकरी व्यक्त करत होते.

तालुक्यात सोयाबीन, कापूस, तूर, मका आदी पिकांची पेरणी मोठ्या प्रमाणात पूर्ण झाली असून पावसाअभावी उगवण झालेल्या पिकांची वाढ खुंटण्याची भीती निर्माण झाली होती. अनेक शेतांमध्ये जमिनीतील ओलावा कमी झाल्याने पिके करपू लागली होती. अशा परिस्थितीत पडलेल्या रिमझिम सरींमुळे पिकांना काही प्रमाणात जीवदान मिळाल्याची भावना शेतकऱ्यांनी व्यक्त केली.

तथापि, हा पाऊस समाधानकारक नसल्याने आगामी काही दिवसांत दमदार पावसाची आवश्यकता असल्याचे कृषी क्षेत्रातील जाणकारांचे मत आहे. पावसाची सातत्यपूर्ण साथ मिळाल्यास खरीप हंगामाला नवसंजीवनी मिळेल, तर पुन्हा पावसाने दडी मारल्यास दुबार पेरणीसह आर्थिक संकटाचा सामना करावा लागू शकतो, अशी चिंता शेतकरी व्यक्त करत आहेत. सध्या तालुक्यातील शेतकरी आकाशाकडे डोळे लावून बसले असून येत्या काही दिवसांत मुसळधार पावसाची अपेक्षा व्यक्त केली जात आहे. वेळेवर आणि पुरेसा पाऊस झाल्यास खरीप हंगाम सावरण्याची आशा निर्माण झाली असून, ग्रामीण भागात पुन्हा एकदा आशावादाचे वातावरण निर्माण झाले आहे.

## सालेकसा पोलिसांची मोठी कारवाई : ८.५० लाखांचा सुगंधित हुक्का तंबाखू व बोलेरो पिकअप जप्त; दोघांविरुद्ध गुन्हा दाखल



**दै. सिंहवाणी वृत्त, सालेकसा- राजु फुंडे**

पोलीस स्टेशन सालेकसा हद्दीतील मौजा रोंढा नाल्याजवळ सालेकसा पोलिसांनी मोठी कारवाई करत बेकायदेशीररीत्या वाहतूक करण्यात येत असलेला सुगंधित हुक्का तंबाखूचा मोठा साठा जप्त केला. या कारवाईत महिंद्रा बोलेरो पिकअप (क्र. एमएच-३५/एजे-१०४२) तसेच एकूण ८ लाख ५० हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, जप्त करण्यात आलेल्या वाहनात १० मोठ्या पांढऱ्या रंगाच्या पोत्यांमध्ये एकूण २,००० नग "आर.के. सुपर प्रिमियम क्वालिटी" हुक्का सुगंधित तंबाखूची पाकिटे (किंमत २ लाख रुपये) आढळून आली. तसेच ५ मोठ्या फिकट पिवळ्या रंगाच्या पोत्यांमध्ये १,००० नग "एम.डी. ७ सुपर प्रिमियम क्वालिटी" हुक्का सुगंधित तंबाखूची पाकिटे (किंमत १ लाख रुपये) जप्त करण्यात आली. याशिवाय ५ लाख ५० हजार रुपये किमतीचे महिंद्रा बोलेरो पिकअप वाहन जप्त करण्यात आले. अशा प्रकारे एकूण ८ लाख ५० हजार रुपयांचा मुद्देमाल पोलिसांनी ताब्यात घेतला.

या प्रकरणी वाहन चालक महेश सुशील नेवारे (वय ४१, रा. बहेला, ता. लांजी, जि. बालाघाट, मध्यप्रदेश) तसेच त्याचा साथीदार जगदीश लहुलाल भोयर (वय ३८, रा. अंधियाटोला, ता. लांजी, जि. बालाघाट, मध्यप्रदेश) यांच्याविरुद्ध सालेकसा पोलीस ठाण्यात गुन्हा क्रमांक ३४४/२०२६ नोंद करण्यात आला आहे. आरोपींविरुद्ध अन्न सुरक्षा व मानके अधिनियम, २००६ तसेच त्याअंतर्गत नियम व विनियम २०११ मधील कलम २६(१), २६(५), २७(३), ३०(२)(), ३(१) (९९), शिक्षापात्र कलम ५९ तसेच भारतीय न्याय संहिता, २०२३ मधील कलम १२३, २७४, २७५ व २२३ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलीस निरीक्षक रवि नागोसे यांच्या मार्गदर्शनाखाली या गुन्ह्याचा पुढील तपास सहाय्यक पोलीस निरीक्षक किशोर मावस्कर, पो.ना. कृष्णकुमार कानस्कर, पो. शि. विकास वेदक आणि पो. शि. जयसिंग बैस हे करीत आहेत.

## एसटी प्रवास महागला

**मुंबई :** राज्य परिवहन प्राधिकरणाने महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या (एसटी) १३.५६ टक्के भाडेवाढीच्या प्रस्तावास मान्यता दिली आहे. आखाती देशांतील युद्धजन्य परिस्थितीमुळे डिझेलच्या दरात झालेली वाढ, एसटी कर्मचाऱ्यांच्या विविध भत्त्यांमध्ये करण्यात आलेली वाढ तसेच वाहनांचे सुटे भाग, टायर आणि देखभाल खर्चात झालेली लक्षणीय वाढ यांचा सर्वंकष विचार करून हा निर्णय घेण्यात आला आहे. अर्थात, या भाडेवाढीच्या मुळे या पुर्वी केलेली साध्या बसेस ची १० टक्के हंगामी भाडेवाढ रद्द होईल

एसटी महामंडळाच्या आर्थिक शाश्वततेसह प्रवाशांना सुरक्षित, दजेर्दार आणि अखंड सेवा देण्यासाठी ही भाडेवाढ अपरिहार्य होती. वाढत्या खर्चाचा भार सहन करत राज्यातील लाखो प्रवाशांना सेवा देणाऱ्या एसटीच्या दैनंदिन कार्यावर आर्थिक ताण निर्माण होत असल्याने, सेवा सुरळीत ठेवण्यासाठी भाडेवाढीचा निर्णय आवश्यक ठरला आहे.

# तहसील कार्यालयातील कथित लाचखोरीच्या चर्चेमुळे प्रशासनावर प्रश्नचिन्ह; सर्वसामान्यांना न्याय कधी?

### दस्तऐवजांपासून शासकीय योजनांपर्यंत 'खर्चा-पाणी'च्या चर्चेने नागरिकांमध्ये नाराजी; निष्पक्ष चौकशीची मागणी

**दै. सिंहवाणी वृत्त, सालेकसा-राजू फुंडे**

गोंदिया जिल्ह्यातील सालेकसा तहसील परिसरात नागरिकांच्या विविध शासकीय कामांबाबत असंतोष वाढत असल्याचे चित्र दिसून येत आहे. शेतकरी, मजूर, विधवा महिला, दिव्यांग तसेच आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांतील नागरिकांना आपल्या वैध कामांसाठी शासकीय कार्यालयांचे वारंवार उंबरठे झिजवावे लागत असल्याची भावना व्यक्त केली जात आहे.

याच पार्श्वभूमीवर काही सेवांसाठी कथितरित्या "खर्चा-पाणी" मागितले जात असल्याच्या चर्चांनी प्रशासनाच्या कार्यपद्धतीवर गंभीर प्रश्न निर्माण केले आहेत.




स्थानिक स्तरावर सुरू असलेल्या चर्चांनुसार, तहसील कार्यालयातील विविध दाखले, प्रमाणपत्रे, रेशन कार्डशी संबंधित कामे, संजय गांधी निराधार योजना तसेच इतर शासकीय योजनांच्या प्रस्तावांमध्ये काही ठिकाणी अतिरिक्त पैशांची मागणी होत असल्याचे आरोप नागरिकांकडून केले जात आहेत. अनेकांचे म्हणणे आहे की, अपेक्षित रक्कम न दिल्यास कामे विलंबाने होतात, तर पैसे देणाऱ्यांची कामे तुलनेने लवकर मार्गी लागतात, अशी चर्चा नागरिकांमध्ये आहे.

तहसील परिसरातील दुय्यम निबंधक कार्यालयाबाबतही दस्तऐवज नोंदणीच्या प्रक्रियेदरम्यान अतिरिक्त रकमेची मागणी होत असल्याच्या तक्रारी वेळोवेळी समोर येत असल्याचे बोलले जाते. या आरोपांमध्ये तथ्य आढळल्यास पारदर्शक, उत्तरदायी आणि भ्रष्टाचारमुक्त प्रशासनाच्या शासनाच्या भूमिकेलाच धक्का बसू शकतो.

नागरिकांच्या म्हणण्यानुसार, काही कर्मचारी उघडपणे "खर्चा-पाणी"ची भाषा करत असल्याची चर्चा आहे. तसेच, तक्रारी करूनही संबंधित प्रकरणांवर प्रभावी कारवाई होत नसल्याचा आरोपही काही नागरिकांनी केला आहे. मात्र, या आरोपांची स्वतंत्रपणे पुष्टी झालेली नाही. त्यामुळे या सर्व बाबींची निष्पक्ष व सखोल चौकशी होणे आवश्यक असल्याची मागणी जोर धरत आहे.

सामाजिक कार्यकर्त्यांचे मत आहे की, शासकीय कार्यालये ही जनतेच्या सेवेसाठी आहेत; नागरिकांना मानसिक व आर्थिक त्रास देण्यासाठी नव्हेत. गरीब, शेतकरी, मजूर, विधवा महिला आणि दिव्यांग नागरिक आधीच अनेक अडचणींचा सामना करत आहेत. अशा परिस्थितीत स्वतःच्या हक्काच्या कामांसाठीही कथितरित्या पैसे द्यावे लागत असल्याची भावना निर्माण होणे ही अत्यंत गंभीर बाब असल्याचे त्यांनी म्हटले आहे.

स्थानिक नागरिकांनी जिल्हाधिकारी, उपविभागीय अधिकारी तसेच संबंधित वरिष्ठ प्रशासकीय अधिकाऱ्यांनी तहसील कार्यालय व संबंधित विभागांमध्ये होत असल्याच्या कथित लाचखोरी आणि अनियमिततेच्या तक्रारींची निष्पक्ष चौकशी करावी, अशी मागणी केली आहे. चौकशीत कोणताही अधिकारी किंवा कर्मचारी दोषी आढळल्यास त्याच्याविरुद्ध कठोर विभागीय व कायदेशीर कारवाई करण्यात यावी, जेणेकरून सर्वसामान्य नागरिकांचा शासकीय यंत्रणेवरील विश्वास अधिक दृढ होईल.

## गडमंदिर व कालिदास स्मारक परिसरामध्ये बिबट्याची दहशत



**दै. सिंहवाणी वृत्त, रामटेक -:** महाराष्ट्राचे आराध्य दैवत व विदर्भाचे अयोध्या मानल्या जाणाऱ्या रामटेक येथील श्रीराम प्रभूच्या गडमंदिर परिसरात व महाकवी कालिदासांच्या स्मारक परिसरात बिबट फिरत असल्याने स्थानिकांमध्ये व पर्यटकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झालेले आहे. रामटेक गडमंदिर व कालिदास स्मारक परिसरामध्ये स्थानिक नागरिक रोज सकाळ आणि सायंकाळी परिसरामध्ये फिरायला जात असल्याने व गडमंदिर परिसरामध्ये स्थानिक व्यावसायिक बिबट्याच्या भीतीने सायंकाळी सात वाजता आपली दुकाने बंद करीत आहेत. मागील तीन दिवसापासून बिबट हा पाळीव प्राण्यांची शिकार करीत असुन १५ जुलै रोजी कालिदास येथे आषाढी प्रथम दिने निमित्य कवी संम्मेलनाचे कार्यक्रम संपल्यानंतर स्थानिक नागरिक कालिदास स्मारक परिसरामध्ये सात वाजता वाढदिवस साजरा करीत होते.

पण सायंकाळी साडे सातच्या दरम्यान बिबट हा कालिदास स्मारक परिसरात दडून बसलेला होता प्रत्यक्ष दर्शनीय स्थानिकांनी नागरिकांनी बघितले व याबाबतची माहिती वनविभागाला देण्यात आली. गडमंदिर परिसरामध्ये विदर्भातीलच नव्हे इतर राज्यातील ही लोक या ठिकाणी प्रभू रामचंद्राच्या दर्शनाकरिता पहाटे पासून ते रात्री दहा वाजेपर्यंत येत असल्याने वर्दळ असल्याने मोठी जीवितहानी होण्याची शक्यता असल्याचे मत स्थानिक व्यक्त करीत आहेत मागील दोन दिवसापासून वन विभागाचे वनपरिक्षेत्र अधिकारी राहुल शिंदे यांच्या नेतृत्वात वन विभागाचे टीम बिबट्याला हुलकावून लावण्याचे शर्तीचे प्रयत्न करीत आहेत पण सदर बिबट्या त्याच परिसरात वारंवार येत असल्याने सदर बिबट्याला पकडून रामटेक तालुक्यात असलेल्या पेंचव्याघ्र प्रकल्प मध्ये सोडण्याची मागणी स्थानिक नागरिक करीत आहेत.

# विद्यार्थ्यांनी घेतला प्रत्यक्ष मतदान प्रक्रियेचा अनुभव; ब. रू. हायस्कूलचा अभिनव उपक्रम

**दै. सिंहवाणी वृत्त, काटोल**

लोकशाही सुदृढ करायची असेल तर शालेय जीवनापासूनच विद्यार्थ्यांना लोकशाही मूल्यांचे बिजारोपण करण्याची आवश्यकता असते. नागरिकशास्त्र विषयात निवडणुकीबाबत शिकवले जाते पण विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष अनुभवातून लोकशाही पद्धतीने निवडणुकीचे धडे शिकविण्याचा यशस्वी प्रयोग बनारसीदास रुईया हायस्कूल, काटोल या शाळेने केला आहे.




शुक्रवारी पार पडलेल्या शाळा नायक व नायिका निवडणुकीत विद्यार्थ्यांनी 'टॅबलेट'वर प्रत्यक्ष मतदान करून आपले प्रतिनिधी निवडले. या माध्यमातून ईव्हीएम मशीनद्वारे पार पडणाऱ्या भारतीय निवडणूक आयोगाच्या मतदानाचा प्रत्यक्ष अनुभव विद्यार्थ्यांना घेता आला.

मुलांमधून जय सुनील येलेकर शाळा नायक व स्वरूप सचिन बऱ्हाटे उपनायक म्हणून तसेच मुलींमधून पूर्वा सुरेंद्र भुजाडे शाळा नायिका व निराली संजय सोमकुवर उपनायिका म्हणून विजयी झाले. या निवडणुकीत मिडलस्कूल विभागातील वर्ग पाचवी ते आठवीच्या ४८८ मुले आणि ४६३ मुली अशा एकूण ९५१ विद्यार्थ्यांनी मतदानाचा हक्क बजावला. मतदानानंतर लगेच निवडणुकीचा निकाल जाहीर करण्यात आला व विजयी उमेदवारांच्या नावांची घोषणा करण्यात आली. शाळेच्या मुख्याध्यापिका वंदना काळे, उपमुख्याध्यापक हिरामण सोमकुवर, पर्यवेक्षक अजय खडसे, ज्येष्ठ शिक्षक भोजराजन चंदन व जेष्ठ शिक्षिका हर्षाली थोटे यांनी नवनिर्वाचित विद्यार्थी प्रतिनिधींचे पुष्पगुच्छ देऊन व त्यांच्या डोक्यावर मुकुट घालून अभिनंदन केले.

शाळेतील शिक्षक पराग करांडे व सागर ढोके यांनी मुलांचे निवडणूक अधिकारी म्हणून तसेच रुपाली तायडे व शुभांगी गजभिये यांनी मुलींचे निवडणूक अधिकारी म्हणून जबाबदारी पार पाडली. तर

### विद्यार्थी प्रतिनिधी निवडणूक मोठ्या उत्साहात संपन्न

मतदान अधिकारी म्हणून नारायण कावडकर, विश्वेश्वर कोरडे, निरूपमा लांडे, लीना सावरकर आदी शिक्षकांनी जबाबदारी सांभाळली.

तसेच विद्यार्थ्यांना मतदान कक्षापर्यंत आणण्यापासून ते मतमोजणी पर्यंतची सर्व प्रक्रिया शाळेतील इतर शिक्षकांनी पार पाडली. ज्यामध्ये धीरज ढोले, भास्कर सिरसाठ, अमित कोट्टेवार, प्रवीण चौधरी, कौस्तुभ पवार, दीपक महल्ले, संदीप बांबल आदी शिक्षकांसह मीनल गिरडकर, ममता पिपरे, किरण मोरे, नलिनी फरकाडे आदी शिक्षिकांसह गोपाल तांबूसकर व लता वानखेडे या शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी देखील निवडणुकीच्या प्रक्रियेत महत्त्वाची भूमिका बजावली.

**'सेल्फी पॉईंट'चे विशेष आकर्षण**

प्रत्यक्ष रांगेत उभे राहून टॅबलेटवर मतदान केल्यानंतर मतदार विद्यार्थ्यांसाठी विशेष 'सेल्फी पॉईंट'ची देखील व्यवस्था करण्यात आली होती. येथे फोटो घेताना विद्यार्थ्यांमध्ये प्रचंड उत्साह पाहायला मिळाला. विद्यार्थ्यांमध्ये सेल्फी पॉईंट चे विशेष आकर्षण दिसून आले.